# नाशिक महापालिकेमध्ये भाजप, शिवसेना उमेदवार आघाडीवर




नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे पहिले सायंदैनिक
किंमत २
भ्रमर
BHRAMAR

Physioflex.
Working towards healthy lifestyle
Physiotherapy Clinic & Fitness Studio
Dr. Moinuddin Farooque (CEO physioflex)
PHYSIOTHERAPIST (M.S.PT.)
9021756646 8329099901
Physiofit Clinic, Shop Number 2, Jumma Masjid, Naikwadi Pura, Patil Gali, Old Nashik
Shivraya Multi Speciality Hospital, DGP Nagar 2, Ambad Link Rd., Near Mauli Lawns, Kamatwade, Nashik

वर्ष ५३ वे, अंक २२०
Year : 53, Issue No. : 220
नाशिक, शुक्रवार दि. १६ जानेवारी २०२६
Nashik, Friday 16 January 2026
R.N.I. Regd. No.20904/72
Postal Reg. No. NSK/16/2024-2026
पाने ६, किंमत २ रुपये
Pages : 6, Price Rs. 2

# बडगुजर, बोरस्ते, हिमगौरी आहेर, राहुल दिवे, सुरेश पाटील, मुकेश शहाणे विजयी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :- नाशिक महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या मतमोजणीत दुपारी १ वाजेपर्यंत हाती आलेल्या निकालांनुसार महापालिकेवर भाजप -शिवसेना युतीने आघाडी घेतली असून, सुरुवातीच्या निकालांमध्ये शिंदे सेनेच्या चारही उमेदवारांनी विजय मिळवला आहे. त्या खालोखाल भाजपचे उमेदवारही विजयाच्या दिशेने वाटचाल करत असून, मनसे व काँग्रेसच्या उमेदवारांनीही मतांमध्ये चांगली आघाडी घेतली आहे.**



काल पार पडलेल्या मतदानानंतर आज सकाळपासून मतमोजणीला सुरुवात झाली. सुरुवातीच्या फेऱ्यांमध्येच अनेक दिग्गज उमेदवारांचे भवितव्य स्पष्ट होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. टपाली मतदानातील कल समोर येताच भाजप, शिवसेना (शिंदे गट), ठाकरे गट, राष्ट्रवादी आणि अपक्षांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळत आहे.

नाशिक शहरातील १,५६३ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडली. काही केंद्रांवर रात्री उशिरापर्यंत मतदान सुरू होते. यंदा नाशिकमध्ये ५६.७६ टक्के मतदान नोंदवले गेले आहे. सन २०१७ च्या तुलनेत सुमारे ५ टक्क्यांची घट झाली. यंदाच्या निवडणुकीत ३१ प्रभागांतील १२२ जागांसाठी ७३५ उमेदवार रिंगणात आहेत. त्यात ५२७ राजकीय पक्षांचे तर २०८ अपक्ष उमेदवार आहेत. नाशिक महापालिकेतील सत्तास्थापनेसाठी ६३ जागांचा आकडा निर्णायक ठरणार आहे.

महानगरपालिका निवडणुकीच्या मतदान केंद्रांवर सुरुवात होण्याआधी पोलिसांनी मतमोजणी प्रतिनिधी यांच्यामध्ये चांगलाच गोंधळ उडाला त्यामुळे काही काळ परिस्थिती गोंधळाची झाली होती यावर तातडीने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून मतमोजणी प्रतिनिधींना आत मध्ये प्रवेश देण्याचे आदेश दिले.

सकाळी मतमोजणी केंद्रांवर ती उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी हे हजर झाले त्यावेळी त्यांच्याकडे ओळखपत्र होते अधिकृत ओळखपत्र असतांना देखील पोलिसांना त्याबाबत कोणत्याही प्रकारच्या सूचना नसल्याचे प्रथमदर्शनी सांगण्यात आले आहे त्यामुळे पोलिसांनी मतमोजणी प्रतिनिधींना आत मध्ये प्रवेश देण्यात मज्जाव केला दहा ठिकाणांपैकी सहा ठिकाणी मतमोजणी केंद्रांवरती अशा स्वरूपाचा गोंधळ सुरुवातीला उडाला होता याबाबतची माहिती संबंधित मतमोजणी केंद्रावरील अधिकाऱ्यांना मिळाल्यानंतर त्यांनी त्याबाबत पोलिसांना सूचना दिल्या आणि मग काही वेळाने मतमोजणी प्रतिनिधींना सोडण्यात आले.

मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर प्रभाग क्र. २९ पहिल्या फेरीत भाजपचे बंडखोर मुकेश शहाणे यांना १६२१, भाजपचे दीपक बडगुजर ७८९, शिवसेनेचे नागरे यांना ३१६ मते पडली.

प्रभाग क्र. १४ (अ) काँग्रेस दिगंबर नाडे ६६४, (श.प.) संजय साबळे ३८९, १४ (ब) काँगेस नाजिया अत्तार ७०८, समिना मेमन (श.प.) २६८, बुशरा शेख (रा.काँ.) ८२०, (क) मध्ये मन्सूरी शबनम ९, शशीकांत हिरवे ८६३, सामियान खान ७६१, (ड) मध्ये रुपाली डहांगे ६४९, इम्रान शेख ३५, दुसरी फेरी (अ) जागृती गांगुर्डे (राष्ट्रवादी) २१५३, दिगंबर नाडे (काँग्रेस) १०९०, (ब) कस्तुरी हिरवे (१७०७), बुशरा शेख (अ.प.) १६८९, (क) रुपाली डहांके (शिंदे सेना) १४०५, शबाना पठाण (अ.प.) ११६५, समिया खान (काँग्रेस) १११२, (ड) सुफि जीन (काँग्रेस) १७८७, अल्फान हाश्मी (अ.प.) १०८३.

प्रभाग ३१ (अ) मध्ये भगवान दोंदे (भाजप) १३३८, संदीप दोंदे (उबाठा) ७८०, अविनाश शिंदे (शिवसेना).

प्रभाग क्र. १७ पहिली फेरीत (अ) मध्ये प्रशांत दिवे (भाजप) ६१४, शिवसेनेचे राहुल कोथमिरे ३३५, मंगेश मोरे (उबाठा) २३८, (ब) मध्ये मंगला आढाव (उबाठा) ६०१, निलम गडाख (भाजप) ४९२,(अ) दुसऱ्या फेरीअखेर प्रशांत दिवे ११८३, राहुल कोथमिरे ६५५, मंगेश मोरे ६२७, (ब) मंगला आढाव १३८७, निलम गडाख ८०७, (क) प्रमिला मैंद ११४७, सुशिला लोखंडे ७८७, शोभा सातभाई ६०४, (ड) शैलेश ढगे १११७, राजेश आढाव ५०३, दिनकर आढाव ८४४.

प्रभाग क्र. ९ (ब) पहिली फेरी दिनकर पाटील १७७१, गुलाब माळी ४७७, (ड) अमोल पाटील १६१२, प्रेम पाटील ६८५, (क) संगीता घोटेकर १२८६, सविता गायकर ८५६ (अ) भारती धिवरे १५४८, शकुंतला पवार ५९२.

प्रभाग ८ (ब) उषा बेंडकोळी १०२४, विष्णूपंत बेंडकोळी ७७७, (क) कविता गायकवाड ९५१, अंकिता शिंदे ९४२, (ड) विलास शिंदे १०७६, प्रवीण पाटील ७९२, (अ) कविता लोखंडे ९१७, नयना गांगुर्डे ८४९,

प्रभाग १३ (अ) पहिली फेरी रश्मी भोसले (शिवसेना) १२९३, आदिती पांडे ६९५, वत्सला खैरे (काँग्रेस) ३२६, (ब) हितेश वाघ (भाजप) ८७३, सुवर्णा मोरे (शिंदे सेना) ८३६, मयुरी पवार (मनसे) ६४१, (क) राहुल शेलार (भाजप) १०२९, दीपक डोके (शिंदे सेना) ५०८, संजय चव्हाण (उबाठा) ४७५, (ड) गणेश मोरे (शिंदे सेना) १२९६, शाहु खैरे (भाजप) ७५७, दुसरी फेरीत (अ) आदिती पांडे २५५२, वत्सला खैरे २६९४, रश्मी भोसले २०२७, (ब) मयुरी पवार ३२५७, हितेश वाघ २२६३, सुवर्णा मोहरे १७६९, (क) राहुल शेलार २७७४, संजय चव्हाण २४२१, (ड) गणेश मोरे २५९८, शाहु खैरे २५७५,

प्रभाग २० पहिली फेरी सतिश निकम (भाजप) १६२२, प्रदीप बागूल (शिंदे सेना) १६१४, (ब) दुर्गा चिडे (शिंदे सेना) २०२४, सीमा ताजणे (भाजप) १९७१, गायत्री गाडेकर (श.प.) १५०३, (क) योगिता गायकवाड (उबाठा) १८७७, सुप्रिया कदम १८५१, जयश्री गायकवाड १८२८, दुसरी फेरी (अ)सतिश निकम १६२२, प्रदीप बागूल १६१४, (ब) दुर्गा चिडे २०२४, सीमा ताजणे १९७१, (ड) कैलास मुदलियार २६०१, संभाजी मोरुस्कर १३३१.

प्रभाग क्र. २५ दुसऱ्या फेरी अखेर (अ)सुधाकर बडगुजर १३५७९, अतुल सानप २८७६, (ब) साधना मटाले ९१८३, शोभना शिंदे ६८८८, (क) कविता नाईक ९९८१, भाग्यश्री ढोमसे ५२८०, (ड) मुरलीधर भामरे ६४३६, अनिल मटाले ४५२१, प्रकाश अमृतकर ४५१८,

१८ दुसरी फेरी (अ) शरद मोरे १३१८, आशा पवार १११७, (ब) रंजना बोराडे ११९२, शितल ताकाटे ७९९, ज्योती माळवे ९५६, (क) भोजने ९४२, चित्रा ढिकले ४९८, (ड) विशाल संगमनेरे १७४४, सुनिल बोराडे ८२३,

प्रभाग क्र. १५ (अ) मिलिंद भालेराव (भाजप) ३५३८, प्रथमेश गिते (उबाठा) २१९०, (ब) अर्चना थोरात (भाजप) ३३६०, सीमा पवार (उबाठा) २२९१, (क) सचिन मराठे (भाजपा) ३८६२, गुलजार कोकणी (उबाठा) १४२४,

प्रभाग क्र. ७ (अ) राजेंद्र सूर्यवंशी (शिवसेना) २४२६, सुरेश पाटील (भाजप) २३६२, (ब) हिमगौरी आहेर (भाजप) २९५५, रोहिणी शिरसाठ (शिंदे सेना) २९१०, (क) स्वाती भामरे २७१६, वंदना रकिमे (शिवसेना) २२७०, (ड) योगेश हिरे (भाजप) १२५०, अजय बोरस्ते (शिंदे सेना) ४०४४.

प्रभाग ७ अ मध्ये दुसऱ्या फेरीमध्ये भाजपाचे सुरेश पाटील यांना ३०२० व शिवसेनेचे सुर्यवंशी यांना २१७२, ७ ब मध्ये भाजपाच्या हिमगौरी आहेर यांना ३१८२, शिरसाट यांना २३९६, ७ क मध्ये भाजपाच्या स्वाती महाजन यांना ३०९२ तर रकिबे यांना १९२७ आणि ड मध्ये भाजपाचे मुन्ना हिरे यांना १७२६ आणि शिवसेनेचे अजय बोरस्ते यांना ३६९० मते मिळाली. प्रभाग क्रमांक ७ अ मध्ये अतिमत भाजपाचे सुरेश पाटील १० हजार ६९५ मते मिळवून विजयी झाले. तेथे सेनेचे सुर्यवंशी यांना ८२७९ मते मिळाली. ७ बमध्ये हिमगौरी आडके या ११ हजार १५८ मते मिळवून विजयी झाल्या. त्यांनी सेनेचे शिरसाट यांचा पराभव केला.शिरसाट यांना ९ हजार ५०० मते मिळाली. ७ क मध्ये भाजपाच्या स्वाती भामरे यांनी सेनेच्या रकिबे यांचा पराभव केला. भामरे यांना ११ हजार ७४० तर रकिबे यांना ७०६२ मते मिळाली. ७ डमध्ये सेनेचे अजय बोरस्ते यांनी भाजपाचे योगेश हिरे यांचा ६१०२ मतांनी पराभव केला. बोरस्ते यांना १३०२२ तर हिरे यांना ६९२० मते मिळाली.

प्रभाग १३मध्ये चौथ्या फेरी अखेर आदिती पांडे भाजप ३७६२, रश्मी भोसले ३६५८, ब मध्ये मयुरी पवार मनसे ४५५७, हितेश वाघ ३१५६, क मध्ये राहुल शेलार ४०९२, संजय चव्हाण ३३५८, डमध्ये शाहू खैरे ३७८५, गणेश मोरे ३५१३,

१४ अ मध्ये तिसऱ्या फेरी अखेर जागृती गांगुर्डे ३५३६, दिगंबर नाडे १५५८, १४ ब शेख बुशरा २६९२, कस्तुरी हिरवे २५१८, १४ क रुपाली डहाणके ३१७६, शबाना पठाण १८३०, १४ ड सुफी जीन २४६२, अल्फान हाश्मी १८११.

प्रभाग १३ अ मध्ये पाचव्या फेरी अखेर आदिती पांडे ४७८०, वत्सला खैरे ४२६८, रश्मी भोसले २९९९, १३ ब मयुरी पवार ५४५८, हितेश वाघ ३९४७, सुवर्णा मोरे २६५७, १३ क मध्ये राहुल शेलार ५१४३, संजय चव्हाण ३९४२, १३ डमध्ये शाहू खैरे ४७९८, गणेश मोरे ४३२१.

प्रभाग १५ अ मध्ये मिलींद भालेराव ५७६८, प्रथमेश गिते ३५३६, १५ ब अर्चना थोरात ५४२२, सिमा पवार ३७६२, १५ कमध्ये चौथ्या फेरी अखेर सचिन मराठे ६२५०, गुलजार कोकणी २३१२.

चौथ्या फेरी अखेर प्रभाग २५ अ सुधाकर बडगुजर १९ हजार ८३४, अतुल सानप यांना ४९७०, २५ ब साधना मटाले १४ हजार १३३, शोभना शिंदे १०४८६, २५ क कविता नाईक १५३३०, भाग्यश्री डोमसे ७६६७, २५ ड मुरलीधर भामरे ९१९१ अनिल मटाले ८२८५.

प्रभाग क्रमांक २५ मध्ये अ गटातून सुधाकर बडगुजर, ब गटातून साधना मटाले, क मधून कविता नाईक आणि ड मधून मुरलीधर भामरे हे विजयी झाले आहेत.

प्रभाग १४ पाचव्या फेरी अखेर १४ अ जागृती गांगुर्डे ९१२६, दिगंबर नाडे ४१२६, १४ ब नाझिया अत्तार १४८३३, बुशरा शेख ३९५०, १४ क सामियाँ खान ४५५६, रुपाली डहांके २७०४, १४ ड सुफी जीन ६३४३, अल्फान हश्मी २४९३.

प्रभाग १२ अ पहिल्या फेरीत भाजपाचे राजेंद्र आहेर यांना ३६४३, शिवसेनेच्या स्मिता पाटोदकर यांना १४०७, ब मध्ये भाजपाच्या वर्षा येवले २१८६, सिमा ठाकरे २७२८, क मध्ये भाजपाच्या सावजी यांना २९०९, राष्ट्रवादीच्या हेमलता पाटील २१६८, १२ ड मध्ये भाजपाचे शिवाजी गांगुर्डे यांना २६७७, तर शिवसेनेचे समीर कांबळे यांना २१२१ मते मिळाली.

भाजपच्या सुधाकर बडगुजर यांना मोठा धक्का बसला आहे. प्रभाग २५ मध्ये ४ पैकी २ जागांवर भाजप तर एका जागेवर शिंदेंची शिवसेना आणि एका जागेवर ठाकरेंच्या शिवसेनेचा उमेदवार विजयी झाला. प्रभाग क्रमांक २५ मध्ये भाजपचे सुधाकर बडगुजर आणि भाजपच्या साधना मटाले विजयी झाल्या. तर इतर २ जागांवर शिंदेंच्या सेनेच्या कविता नाईक आणि ठाकरेंच्या शिवसेनेचे मुरलीधर भामरे विजयी झाले. भाजपने पुरस्कृत केलेल्या भाग्यश्री ढोमसे आणि प्रकाश अमृतकर हे पराभूत झाले.

प्रभाग क्र. ७ मध्ये भाजपच्या आमदार सीमा हिरे याचे दीर योगेश हिरे यांचा प्रभाग सात मधून शिंदे सेनेचे अजय बोरस्ते यांनी पराभव केला. या प्रभागात मुन्ना हिरेंव्यतिरिक्त भाजपचे इतर तीनही उमेदवार विजयी झाले आहेत.

या निकालानंतर महापौर पदाचे आरक्षण कसे असणार याकडे आता नाशिककरांचे लक्ष लागले आहे.

## भाजपचे बंडखोर मुकेश शहाणे विजयी

अतिशय प्रतिष्ठेच्या ठरलेल्या सिडकोतील प्रभाग २९ मधील भाजपचे अधिकृत उमेदवार दीपक बडगुजर व भाजपचे बंडखोर उमेदवार मुकेश शहाणे यांच्यात झालेल्या लढतीमध्ये मुकेश शहाणे यांनी दीपक बडगुजर यांचा पराभव करत विजय मिळवला आहे.

## प्रभाग १६ मध्ये शिंदे सेनेचे पॅनल विजयी

प्रभाग क्र. १६ मध्ये शिंदे सेनेचे चारही उमेदवार विजयी झाले आहेत. राहुल दिवे, आशा तडवी, पुजा नवले व ज्योती जोंधळे यांचा महापालिकेतील पहिला विजयाचा निकाल जाहीर झाला.




शहरातील मतमोजणी केंद्रांवर जाऊन तेथील पोलीस बंदोबस्ताची व कामकाजाची पाहणी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी केली.

## नाशिकरोडला अपुऱ्या जागेमुळे मतमोजणी विस्कळीत

**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) :-** मतदान मोजणीच्या प्रक्रियेला नाशिकरोड विभागीय कार्यालयामध्ये सुरुवात झाली आहे. प्रभाग क्रमांक २०, २१ आणि २२ या प्रभागांची मतमोजणी नाशिकरोड येथील मनपा विभागीय कार्यालयात कार्यालयात सकाळी दहा वाजेपासून सुरू झाली. प्रथम प्रभाग क्रमांक २० च्या उमेदवारांची मतमोजणी सुरू झाली. सभागृहात मतमोजणी प्रतिनिधींची प्रचंड गर्दी झाल्याने काही उमेदवारांच्या मतमोजणी प्रतिनिधींना सभागृहात प्रवेश करताना काही काळ गोंधळ उडाला एकंदरीतच कमी जागा असल्याने उमेदवार आणि उमेदवारांच्या मतमोजणी प्रतिनिधींनी संताप व्यक्त केला.

## मुंबई महापालिकेत भाजप–शिवसेना महायुतीला यश; ठाकरे बंधूंना धक्का

मुंबई (भ्रमर वृत्तसेवा) :– संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून असलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या दुपारी १ वाजेपर्यंत हाती आलेल्या निकालानुसार भाजप ९२, शिंदे सेना २६ ठिकाणी आघाडीवर तर ठाकरे गट ६० जागांवर, काँग्रेस १२ जागांवर, मनसे ९ जागांवर तर ८ अपक्ष उमेदवार आघाडीवर होते. या निकालामुळे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीला मोठा धक्का बसला आहे.

मुंबई महानगरपालिकेसाठी २२७ जागांसाठी जवळपास ५२.९४ टक्के मतदान झाले.

मुंबई महानगरपालिकेच्या पहिला निकाल वॉर्ड क्रमांक १८३ मधील काँग्रेसच्या उमेदवार आशा काळे विजयी झाल्या आहेत. वॉर्ड क्रमांक १८३ मध्ये मनसेच्या पारुबाई कटके, शिवसेना शिंदे गटाचे वैशाली शेवाळे आणि काँग्रेसच्या आशा काळे यांच्यात लढत होती.

मतमोजणी दरम्यान पहिल्या एका तासात भाजप ११, शिंदेंची शिवसेना १०, शिवसेना ठाकरे गट ११, मनसे ६, काँग्रेस ५, तर इतर ३ जागांवर आघाडीवर होते. मुंबई महानगरपालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी ११४ जागांची गरज आहे. हा आकडा भाजप–शिंदे सेना युती गाठण्याची शक्यता आहे.

मुंबई महानगरपालिकेत महायुतीला शह देण्यासाठी तब्बल २० वर्षांनंतर ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. उद्धव ठाकरेंचा शिवसेना ठाकरे गट आणि राज ठाकरेंची मनसेने युती केली. ठाकरे बंधूंच्या या युतीला शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही पाठिंबा दिला. त्यामुळे मुंबईत शिवसेना ठाकरे गट, मनसे आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र लढले. तर दुसरीकडे ठाकरेंचा गड काबीज करण्यासाठी भाजप आणि शिंदेंची शिवसेना पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरले. अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस स्वतंत्र्य मैदानात उतरली. तर काँग्रेस आणि वंचितने एकत्र निवडणूक लढवली. गेल्या २५ वर्षांपासून मुंबई महापालिकेवर असलेली ठाकरेंच्या शिवसेनेची सत्ता संपूष्टात आली आहे.

## नाशिक महानगरपालिकेतील पोस्टल मतदानाची आकडेवारी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** प्रभाग क्र. १३ मध्ये भाजप १६, प्रभाग ९ मध्ये दिनकर पाटील, अमोल पाटील, प्रभाग ७ मध्ये अजय बोरस्ते, प्रभाग ८ मध्ये विलास शिंदे, प्रभाग २९ मध्ये मुकेश शहाणे, प्रभाग २५ मध्ये सुधाकर बडगुजर तर प्रभाग ३ मध्ये अंबादास खैरे हे पोस्टल मतमोजणीत आघाडीवर होते.

प्रभाग २५ (अ) मध्ये पोस्टल मतदान बडगुजर (६३), सानप (१५), लांडगे (८), (ब) मध्ये साधना मटाले (५१), शिंदे (२०), (क) मध्ये कविता नाईक (३८), भाग्यश्री ढोमसे (३२), (ड)मध्ये मुरलीधर भामरे (उबाठा) (३६), अनिल मटाले (शिवसेना) (१९), प्रभाग २० (अ) अश्विनी पवार (१३), सतिश निकम (९), (ब) मध्ये गायत्री गाडेकर (१७), सीमा ताजणे (१२), (क) मध्ये योगिता गायकवाड (१७), सुप्रिया कदम (११), जयश्री गायकवाड (७), (ड) मध्ये हेमंत गायकवाड (१९), कैलास मुदलियार (८), संभाजी मोरुस्कर (७), प्रभाग ११ (ड) मध्ये रिपाइंचे कारागृहात असलेले प्रकाश लोंढे आघाडीवर आहेत.

एकंदरीत ३१ प्रभागांत पोस्टल बॅलेटमध्ये भाजप ८, शिवसेना ५, राष्ट्रवादी २, उबाठा ३, मनसे १, शरद पवार राष्ट्रवादी १, इतर २ आघाडीवर होते.

प्रभाग ११ (अ) सविता काळे २०, दीक्षा लोंढे १२, (ब) मानसी शेवरे १७, वैशाली बेंडकुळे ९, (क) सीमा निगळ १३, सोनाली भंदुरे ९, (ड) प्रकाश लोंढे १२, दिलीप निगळ १०.

प्रभाग १० (अ), शशिकांत जाधव १३, विश्वास नागरे १२, (ब) इंदूबाई नागरे २१, कलावती सांगळे ९, (क) पल्लवी पाटील १३, माधुरी बोलकर १२, वृषाली सोनवणे ११, (ड) समाधान देवरे २०, नंदु जाधव ७.

प्रभाग ९ (अ), भारती धिवरे १४, शकुंतला पवार ६, (ब) दिनकर पाटील २१, कावेरी कानेकर ३, गुलाब माळी ३, (क) सविता गायकर ६, संगिता घोडेकर १०, (ड) अमोल पाटील १८, प्रेम पाटील ७.

८ (क) कविता गायकवाड २०, अंकिता शिंदे १७, (ड) विलास शिंदे २१, प्रवीण पाटील १८, (अ) नयना गांगुर्डे २०, कविता लोखंडे १६, (ब) उषा बेंडकोळी २१, विष्णूमंत बेंडकोळी १९.

प्रभाग १६ (अ) राहुल दिवे २३, कुणाल वाघ १२, रमेश जाधव ११, (ब) चंद्रकांत गांगुर्डे १८, आशा तडवी १८, चेतन दराडे १५, (क) पुजा नवले २२, वंदना मनचंदा १८, पुष्पा ताजनपुरे १२, (ड) ज्योती जोंधळे ११, माधुरी पगारे ८, सुषमा पगारे ८, मेघा साळवे ८.

## ठाणे महानगरपालिकेत शिंदेंच्या सेनेची आघाडी

**ठाणे (भ्रमर वृत्तसेवा) :-** ठाणे महानगरपालिकेच्या मतमोजणीच्या कलांनुसार शिंदेंची शिवसेना २५ जागांवर तर भाजप १० जागांवर आघाडीवर होते. शिवसेना ठाकरे गट एका जागेवर, मनसे एका जागेवर आणि राष्ट्रवादी शरद पवार गट ७ जागांवर आघाडीवर होते.

ठाणे महानगरपालिका निवडणुकीचा निकाल आज जाहीर होत आहे. ठाणे महानगरपालिकेत सरासरी ५५.५९ टक्के मतदान झाले. ठाणे हा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला राहिला आहे. ठाण्यात यंदा भाजप–शिवसेना युती आणि ठाकरे बंधू यांच्यात आरोप–प्रत्यारोपांचा सामना रंगल्याने ठाणे महापालिकेच्या निवडणुकीकडे मतदारांचे लक्ष लागून होते. या महापालिकेवर कोणाचा झेंडा फडकणार या विषयीची उत्सूकता लागून राहिली होती.

ठाणे महानगरपालिकेवर गेल्या ३० वर्षांपासून शिवसेनेचा भगवा फडकत आहे. शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांच्या काळापासून ठाणे महानगरपालिका हा शिवसेनेचा बालेकिल्ला राहिला आहे. केवळ १९८७ ते १९९३ या काळात ठाणे महानगरपालिकेवर काँग्रेस पक्षाची सत्ता होती. हा काळ वगळता ठाणे महानगरपालिका म्हणजे शिवसेना हे अविभाज्य समीकरण राहिले आहे. त्यामुळे ठाणे महानगरपालिकेत यंदा कोणाचा झेंडा फडकणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

ठाण्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. यंदाच्या निवडणुकीत शिवसेना फुटली असली तरी बहुतांश माजी नगरसेवक शिंदे गटासोबत आहेत.




## राशीभविष्य

- **मेष** : दिवसाची सुरूवात उत्तम होईल. योजना आकाराला येऊ लागतील. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **वृषभ** : वैवाहिक सौख्य लाभेल. जुन्या ओळखींचा लाभ घ्यायला हवा. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **मिथुन** : महत्त्वाची कामं मार्गी लागतील. कौटुंबिक ताण वेळीच दूर होतील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल.
- **कर्क** : आर्थिक बाबतीत सावधगिरी बाळगावी. जुनी येणी सहज वसूल होतील. प्रवासात काळजी घ्यावी.
- **सिंह** : भावंडांशी वाद-विवाद टाळावेत. महत्त्वाचे करार लांबणीवर पडतील. यंत्र, वाहनांचा वापर नीट करा.
- **कन्या** : मुलाखतीत यश मिळवता येईल. व्यवसायात साधारण स्थिती राहील. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **तूळ** : सरकारी कामं मनाजोगी होतील. कारकिर्दीच्या नव्या संधी लाभतील. डोळ्यांचे विकार संभवतात.
- **वृश्चिक** : महत्त्वाच्या कामांसाठी पाठपुरावा करावा लागेल. सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. चिंता नसावी.
- **धनु** : स्थावर प्रश्नात तडजोड करावी. उपजत गुणांना वाव मिळेल. प्रकृती सांभाळायला हवी.
- **मकर** : आर्थिक बाबतीत ताण राहील. नव्या योजना लांबणीवर पडतील. कर्ज प्रकरणं प्रलंबित राहतील.
- **कुंभ** : लक्ष विचलित करणाऱ्या घटना संभवतात. बोलताना विचार करावा. आर्थिक कामात दिलासा मिळेल.
- **मीन** : आध्यात्मिक प्रगती होईल. धार्मिक उपक्रमांकडे ओढा राहील. उपजत कला-गुणांचा विकास होईल.

## दिनविशेष

### १६ जानेवारी

१९०१ : महादेव गोविंद रानडे यांचा मुंबई येथे मृत्यू.
१९३८ : बंगालमधील श्रेष्ठ कादंबरीकार डॉ. शरदचंद्र चटोपाध्याय यांचे निधन.
१९२६ : संगीतकार ओ.पी. नय्यर यांचा जन्म.
१९७८ : जनता सरकारने १,००० रुपयाच्या नोटा रद्द केल्या.
२०१३ : दिल्ली न्यायालयाने शिक्षक भरती प्रकरणात हरियानाचे माजी मुख्यमंत्री ओमप्रकाश चौताला, त्यांचे चिरंजीव व आमदार अजय चौतालासह अन्य ५३ जणांना दोषी ठरवलं.

## आरोग्यमंत्र

### खोकल्याकडे दुर्लक्ष नको

हिवाळ्यात सर्दी, डोकेदुखी, खोकला यासारखी दुखणी डोकी वर काढतात. त्यातही सततचा खोकला नकोसा वाटतो. त्यावर औषधही घेतलं जातं. पण तरीही खोकला थांबत नसेल तर मात्र दुर्लक्ष करू नये. कारण हे एखाद्या गंभीर आजाराचे संकेत असू शकतात. याविषयी...

* खोकल्यावर वेळीच उपचार केले नाहीत आणि याचं रूपांतर न्युमोनियामध्ये होतं. म्हणूनच खोकल्याकडे दुर्लक्ष करू नये. * दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकणारा खोकला फुफ्फुसाच्या कॅन्सरचं लक्षण असू शकतं. खोकल्यासोबत रक्त पडत असेल, गिळताना त्रास होत असेल, आवाज घोगरा झाला असेल, छातीत दुखत असेल तर तातडीने तपासणी करून घ्यावी. * दहा दिवसांपेक्षा जास्त काळ कोरडा खोकला आणि सर्दी असेल तर तातडीने डॉक्टरांकडे जा. हे न्युमोनियाचं लक्षण असू शकतं. श्वास घेताना त्रास होणं, ताप येणं आणि पिवळट, हिरवा रक्तमिश्रित कफ पडणं ही न्युमोनियाची लक्षणं आहेत. * धूम्रपानाची सवय असेल किंवा आधी धूम्रपान केलं असेल तर तुम्हाला सीओपीडीचा धोका आहे. यात प्रचंड कफ निर्माण होतो. दिवसा कफाचं प्रमाण बरंच जास्त असतं. याबरोबरच धाप लागणं, छातीत ताठरता जाणवणं अशी लक्षणं असतील तर तातडीने डॉक्टरांकडे जा. * तीन आठवड्यांपेक्षा जास्त काळपर्यंत टिकून राहणारा खोकला, छातीत दुखणं, थकवा, वजन कमी होणं, ताप, रात्री घाम येणं, खोकताना रक्त पडणं ही टीबीची लक्षणं असू शकतात.



## फन टाईम

### फिस्टबॉल आणि वॉल बॉल

रोमन लोकांनी बऱ्याच हटके खेळांचा शोध लावला. 'फिस्टबॉल' ही सुद्धा त्यांचीच निर्मिती. पण याबाबत लोकांना फारशी माहिती नाही. या खेळाच्या स्पर्धांना 'फिस्टिव्हस' म्हणतात. तर खेळाडू 'फिस्ट बॉलर्स' म्हणून ओळखले जातात. जगातल्या २५ देशांमध्ये हा खेळ खेळला जातो. फिस्टबॉल आणि व्हॉलीबॉलमध्ये बरंच साम्य आहे. पण फिस्टबॉल खेळताना मुठी वळवून ठेवायच्या असतात. या मुठींनी किंवा हातांनी बॉल मारता येतो. या खेळात दोन संघ सहभागी होतात. मधोमध जाळी बांधलेली असते. प्रत्येक संघात पाच खेळाडू असतात. प्रतिस्पर्धी संघाने मारलेल्या चेंडूचा टप्पा पडला तरी तो मारता येतो. पाच सेट्सनंतर खेळाचा निकाल लागतो. फिस्टबॉलची एक आंतरराष्ट्रीय फेडरेशनही आहे. ही फेडरेशन फिस्टबॉलच्या स्पर्धांचं नियमित आयोजन करतं. ऑलिम्पिकमध्ये समावेश नसलेल्या खेळांची स्पर्धा म्हणजे 'वर्ल्ड गेम'मध्ये फिस्टबॉलचा जागतिक विजेता ठरतो.

(क्रमश:)

## फॅशन पॅशन

### स्टायलिश दिसायचं तर...

आपल्याकडे घालायला काहीच चांगलं नाही, असं वरचेवर वाटतं का? नेहमी तीच ती फॅशन करुन किंवा एकाच पद्धतीचे कपडे घालून कंटाळा आला आहे का? तर मग तुमच्याकडे काही ॲक्सेसरीज, जॅकेट्स, पादत्राणं असायलाच हवी. त्यांचा वापर करुन आहे त्या प्रावरणांनिशी आपला लूक खुलवता येतो. स्टायलिश दिसण्यासाठी नेमकं काय करता येईल, पाहू या.

* छानशा टोटे किंवा बकेट बॅगमुळे तुमच्या लूकला चार चाँद लागतील. स्टाईलला परिपूर्णता लाभेल. पण बॅगची निवड करताना शरीरयष्टीचाही विचार व्हायला हवा. बांधेसूद महिलांनी मुलायम फॅब्रिकच्या किंवा नीट बांधणी केलेल्या पर्स निवडाव्या. स्थूल महिलांच्या हातात छोट्या आकाराच्या पर्स शोभून दिसतात.

* तुमच्या वॉर्डरोबमध्ये फिटिंगवालं एथनिक जॅकेट असायला हवं. ते कोणत्याही पेहरावावर शोभून दिसतं. क्रॉप टॉप आणि पलाझोवर तर विशेष शोभून दिसतं. त्यावर मस्त झुमके घाला. डेनिमवरही असं जॅकेट शोभून दिसेल. सुंदर नक्षीकाम केलेलं किंवा थ्रेड वर्कवालं जॅकेट जास्तच खुलून दिसतं. (क्रमश:)

## पंचांग

**शुक्रवार, १६ जानेवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
पौष कृ. १३, चंद्रराशी : धनु,
नक्षत्र : मूळ, योग : ध्रुव,
सूर्योदय ७.१७, सूर्यास्त ६.२०

## फॉरवर्डस

**पलट क़र देख़नें क़ी आदत नहीं हैं हमारीं...**

**अलविदा कहनें वालें आज़ भीं इन्तज़ार में हैं...!**

## फॅशन

मुलींवर लाल रंग खुलून दिसतो. पण मुलांचं काय? त्यासाठी स्टायलिंगचे फंडे तुम्हाला जमायला हवे. ते जमले की लाल रंगात तुम्ही शोभून दिसलाच म्हणून समजा. लाल कपडे घालण्याचा विचार असेल तर या टिप्स नक्की फॉलो करा.

* लाल रंग स्मार्ट पद्धतीने कॅरी करायचा असेल तर 'पुलिंग ऑफ जंपर्स' हा अगदी साधा आणि सोपा पर्याय आहे. यात गडद आणि भडक लाल रंगांची निवड करा. त्यासोबत घातल्या जाणाऱ्या जॅकेट किंवा पँटमुळे हा भडकपणा कमी होतो. (क्रमश:)

## करिअरवाटा

### 'न्यूक्लिअर मेडिसीन'विषयी...

वैद्यकीय उपचारांमध्ये न्यूक्लिअर मेडिसीनचा बोलबाला आहे. यामध्ये रोगाचा अंदाज घेण्यासाठी आणि उपचार करण्यासाठी रेडिओ न्युक्लाईडसचा वापर केला जातो. त्यामुळे त्याला 'न्यूक्लिअर मेडिसीन' असंही म्हणतात. या उपचारात इंजेक्शनद्वारे शरीरात रेडिओ आयसोटोपस् टोचले जातात. ते शरीरामध्ये सौम्य किरणोत्सर्जन करतात ज्यामुळे शरीरात



होणारे बदल नोंदले जाऊन रोगाचं निदान केलं जातं. शरीरातील विशिष्ट ग्रंथींचे आजार या पद्धतीने बरे केले जातात. प्राथमिक अवस्थेतल्या कर्करोगावर ही उपचारपद्धती गुणकारी असल्याचं दिसून आलं आहे. त्यामुळे या उपचार पद्धतीचं महत्त्व वाढत आहे. या पद्धतीत पॉझिट्रॉन एमिशन टोमोग्राफी, अल्ट्रा सोनोग्राफी आणि मॅग्नेटिक रिझोनन्स इमेजिंग अशा तंत्रांचा उपयोग केला जातो. भारतीय संरक्षण दलाच्या अखत्यारीतले संरक्षण संशोधन आणि विकास संघटन (डीआरडीओ) या संस्थेच्या अधिकारक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या इन्स्टिट्यूट ऑफ न्यूक्लिअर मेडिसीन ॲन्ड अलाईड सायन्सेस या संस्थेत या शास्त्राचं शिक्षण आणि संशोधन केलं जातं. न्यूक्लिअर मेडिसीन या वैद्यकीय उपचारासाठी आवश्यक असणारी साधनेसुद्धा इथे विकसित करण्यात आली आहेत.

## खेचाखेची

### बाबू

**ती** – ऐक ना बाबू...

**तो** – मला बाबू नको म्हणत जाऊ यार,

.
.
.

बाबू माझ्या बाबांचं नाव आहे...

## वेगळं काही

सर्वसाधारणपणे एका प्रौढ गेंड्याची उंची सहा फूटांपर्यंत तर लांबी ११ फुटांपर्यंत वाढू शकते. त्याचं वजन २००० ते २७०० किलोग्रॅम असतं. गेंड्याचं शरीर त्वचेच्या विविध थरांनी बनलेलं असतं. सूर्याच्या तीव्र किरणांचा त्रास होऊ नये म्हणून गेंड्याला जाड कातडीचं वरदान लाभलं आहे. गेंडे चिखलात राहतात तसंच ते शाकाहारी आहेत. शिंगांसाठी गेंड्यांची मोठ्या प्रमाणावर शिकार केली जाते. पण प्रत्यक्षात ते शिंग नसून हजारो जाड आणि बळकट केसांचा गुच्छ असतो. हे शिंग तुटल्यास नवं शिंग येतं. आशियातल्या गेंड्यांना एक शिंग असतं तर आफ्रिकेतले गेंडे दोनशिंगी असतात. गेंडे ५० ते ५५ किलोमीटर प्रती तास वेगाने धावतात. त्यांची ऐकण्याची आणि हुंगण्याची क्षमता खूप चांगली असते.


## घरसंसार

### दुर्गंधीचा सामन करताना...

कितीही वेळ वाळत ठेवले तरी न सुकल्यामुळे ओलसर कपडे वापरावे लागणं, दमट हवेमुळे सतत घाम येणं, लवकर केस न वाळणं या पावसाळ्यात जाणवणाऱ्या सर्वसाधारण समस्या आहेत. या सगळ्यामुळे अंगालाही एकप्रकारचा दुर्गंध येऊ लागतो. सहाजिकच चारचौघात मान खाली घालण्याची वेळ येऊ शकते. हे टाळायचं असेल तर टी ट्री ऑईलची मदत घ्या. एका बाऊलमध्ये पाणी घेऊन त्यात टी ट्री ऑईलचे काही थेंब मिसळा आणि त्याने अंग पुसून घ्या. हा प्रयोग वरचेवर केल्यास शारीरिक दुर्गंधीची समस्या दूर होते. * कुंद हवेमुळे घरात आणि आजूबाजूच्या परिसरातही विशिष्ट प्रकारचा कुबट वास भरून राहतो. एअर फ्रेशनर किंवा अगरबत्ती लावूनही तो जात नाही. अशा वेळी होममेड फ्रेशनरचा वापर हा या समस्येवरील सर्वोत्तम उपाय ठरतो. हे फ्रेशनर कसं बनवायचं ते जाणून घ्या. त्यासाठी एक वाटी डिस्टिल्ड वॉटर, अर्धा कप व्होडका, दहा टेबलस्पून इसेंन्शिअल ऑईल ही सामग्री एकत्र मिसळून स्प्रे बॉटलमध्ये भरून ठेवा. होममेड फेशनर तयार आहे. ते फवारल्यास दुर्गंध नाहिसा होईल.



# शब्दकोडे क्रमांक २१२४



**आडवे शब्द :-**
१) संपूर्ण, सर्व
३) एक सुगंधी वनस्पती
५) ज्वर
८) सार्वजनिक वाहतूक गाडी
१०) कच्चे रेशीम धुताना निघणारा गाळसाळ
११) नोकरी करणारा
१२) उग्र वास
१३) मोटार
१५) तुरुंग (हिं.)
१७) स्त्री, बाई
१९) लक्ष्मीचे एक नाव
२१) मंगल प्रसंगी वाजविण्याचे एक वाद्य
२२) वांती
२५) सोन्याचे हरीण
२८) विशेष परिचय, दाट मैत्री
२९) थकवा, ग्लानी
३०) खडकाळ जमीन
३१) हत्तीसारखे हळू व डौलात चालणे
३३) गवताचे पान
३४) पर्ण
३५) मुलगी, कन्या
३७) बैलाच्या मानेवरील जोखड
३८) सुकुमार, एक प्रकारचा स्वादिष्ट तांदूळ
४०) उबदार पांघरुण(इं.)
४२) औदार्य, उदारता
४५) क्रिकेट मधील धाव
४७) पं. नेहरुजींचे नाव
५०) तोटा, हानी
५१) वाहून नेणारा
५३) नाश पावणारा
५४) सिंह
५७) दारुचा एक प्रकार
५९) हरीणाची मादी
६०) धोकादायक (हिं.)
६१) बिना वासाचे एक पांढरे फूल
६३) भार
६५) मुलाची वा मुलीची मुलगी
६६) गावठी सिगारेट
६७) परत(हिं.)
६८) पातक
६९) मनोगत, हेतू, विचार
७१) लसूणाची पाकळी
७२) कडक
७४) हिंदीत पाऊल
७६) पायाचा खालचा भाग
७७) शुष्क, सुका
७८) घोड्यावरून मारलेली फेरी

**उभे शब्द :-**
१) मंत्रीमंडळ
२) अंगावरील बारीक केस
४) दावानल
५) दह्याचे सरसरीत पेय
६) अनुमती
७) *** गावसकर
८) नाव खराब झालेला
९) साप
११) सूत काढण्याची फिरकी
१४) श्री विष्णू, रमापती
१६) शरम
१८) मीठ
२०) दिवस
२१) मनाला टोचणारे दु:ख
२४) नेत्र
२५) ढीग
२६) शिकार
२७) हत्ती
२८) नवऱ्याबरोबर दहन करणारी
२९) चंद्र
३२) प्रयाण करणे
३३) उत्तीर्ण (इं.)
३४) झाडाभोवतीचा कट्टा
३६) बाजेची सुती पट्टी
३९) न्यूनता, चणचण
४०) मातीचा कण
४१) झरोका
४२) घरातील मोठी खोली, उसाच्या चरकाचे वरचे तकट
४३) मुलगा, पुत्र
४४) वसाहत
४३) मसाल्यातील एक
४६) दागदागिने
४८) शिव ! शिव ! दु:खोद्गार
४९) शेतकीची कामे
५२) शंकर
५५) कमळ
५७) शाश्वत, चिरकाल
५८) वेळी ----- अवेळी, रात्री बेरात्री
६०) पिच्छा, हट्ट, आग्रह
६२) मजूर, माणूस
६४) जास्वंद
६५) नॉटआऊट
६७) गंध
६९) दहावी रास
७०) वाळलेला बोंबील मासा
७१) सत्ता
७२) धातूचा धागा
७५) दारू, शराब

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मं | दि | र | | च | ल | न | व | ल | न | | खा | रे | वा | रे |
| | रं | ग | म | हा | ल | | र्त | | व | म | न | | म | स |
| स | गा | | हा | | त | हा | न | ले | ला | | सा | मा | न | |
| ता | ई | त | | फु | | ट | | स | ई | सु | मा | र | | वा |
| र | | पा | | क्र | ट | क | स | र | | धा | | हा | तो | डी |
| | क | स | र | | व | | हा | | सा | | स | ण | क | |
| पा | पा | | वि | ना | क्र | र | ण | | क | व | न | | डा | स |
| हु | र | डा | | म | | द | | पा | व | न | | ऋ | | म |
| ण | | क्र | ना | मा | गू | न | आ | ली | | रा | व | ण | भा | त |
| चा | क | | स | त्र | | क | प | | सा | ज | रा | | क | ल |
| र | | क्र | क्र | | अ | | प | डा | व | | ह | जे | री | |
| | वे | स | | अ | व | स | र | | क्र | क्र | | व | | शा |
| अ | | रा | णी | व | सा | | भा | स्क | र | | स | ण | वा | र |
| मा | मा | | | मा | न | भा | व | | | को | रा | | स | दा |
| प | सा | य | दा | न | | क | | स | ट | र | फ | ट | र | |

# मुक्त विद्यापीठाचा फेब्रुवारीत दीक्षांत समारंभ

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३१ वा दीक्षांत (पदवीप्रदान) समारंभ बुधवार दि. ४ फेब्रुवारी रोजी विद्यापीठ मुख्यालयात आयोजित करण्यात आला आहे. त्यात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवीग्रहण करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी येत्या दि. २० जानेवारीपर्यंत आपल्या उपस्थितीची ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नोंदणी करायची आहे. डिसेंबर २०२४, तसेच मार्च व जून २०२५ मध्ये झालेल्या परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थी पदवी प्रमाणपत्र घेऊ शकतात.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनानुसार हा दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी केल्यानंतरच दीक्षांत समारंभात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवीग्रहण करता येईल, तसेच दीक्षांत समारंभाच्या दिवशी विद्यापीठाने निर्धारित केलेल्या वेळेत विद्यापीठ मुख्यालयात हजर राहून व अनामत रक्कम ५०० रुपये भरून विद्यार्थ्यांना दीक्षांत शाल घ्यावी लागेल. अनामत रक्कम ऑनलाईन पद्धतीने आधीदेखील भरता येईल.

अनामत रक्कम ऑनलाईन पद्धतीने भरण्याबाबत, तसेच दीक्षांत समारोहासंबंधीची सर्व माहिती समारंभापूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील https://ycmou.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=28329 या लिंकवर वेळोवेळी प्रसिद्ध केली जाईल. ती विद्यार्थ्यांनी पाहावी.

पीएच. डी. पदवीसाठी पात्र विद्यार्थ्यांची उपस्थिती गृहीत धरण्यात आलेली आहे. त्यांनी स्वत:च्या उपस्थितीची नोंद करू नये. ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या उपस्थितीबाबतची ऑनलाईन स्वीकृती नोंदविली आहे, त्यांनाच दीक्षांत समारोहाच्या दिवशी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील. ज्यांनी नोंदणी केलेली नाही, त्यांची प्रमाणपत्रे दीक्षांत समारोहानंतर काही कालावधीत त्यांच्या अभ्यास केंद्रामार्फत वितरित केली जातील. त्यासाठी त्यांना विद्यापीठात येण्याची आवश्यकता नाही. नोंदणी न करता दीक्षांत समारंभात आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार नाही. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे व परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील यांनी केले आहे.

सभी शुभअंक संख्याशास्त्र और ज्योतिषशास्त्र पर आधारित है।

शुक्रवार
१६/१/२०२६
कल्याण शुभअंक

| | | |
|---|---|---|
| ४ | ६ | ८ |
| ११२ | ३४९ | ३७८ |
| २२० | ३६७ | ४४० |
| ४६ | ६२ | ८४ |
| ४८ | ६४ | ८६ |

शुक्रवार
१६/१/२०२६
मुंबई शुभअंक

| | | |
|---|---|---|
| ३ | ५ | ७ |
| ४९० | १५९ | १७९ |
| ३५५ | ६९० | ८९० |
| ३५ | ५७ | ७३ |
| ३७ | ५९ | ७५ |

## छोटी जाहिरात

### ज्योतिष

ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र व जन्मकुंडलीप्रमाणे. श्री प्रभूज्योतिष ऋषी. **संपर्क : काश्यपी फ, मामा मुंगी कार्यालयामागे, पंपिंग स्टेशन, गंगापूर रोड, नाशिक. मो. नं. ७५०७००६३८६.**

**वाचकांना सूचना :-** भ्रमर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्याची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल भ्रमर वृत्तपत्र जबाबदार राहणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.



# निफाड माध्यमिक शिक्षक पतसंस्थेची प्रगती उल्लेखनीय : आ. सत्यजित तांबे

**निफाड (भ्रमर वार्ताहर) :–** निफाड तालुका माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेची प्रगती सातत्याने उंचावत असून, संस्थेची भव्य-दिव्य इमारत, प्रशस्त जागा आणि तालुकास्तरावर अद्ययावत स्वरूपाचे बहुउद्देशीय सभागृह असलेली ही एकमेव कर्मचारी पतसंस्था असल्याचे गौरवोद्गार नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी काढले.

निफाड तालुका दौऱ्यादरम्यान निफाड माध्यमिक शिक्षक पतसंस्थेस दिलेल्या भेटीत ते बोलत होते. यावेळी आ. तांबे यांनी पतसंस्थेच्या विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा घेत शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न, शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, तसेच संघटनात्मक मजबुती याबाबत मार्गदर्शन केले. शिक्षकांच्या प्रश्नांसाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुढे बोलताना आ. तांबे म्हणाले, की शिक्षक नेते तथा संस्थेचे संस्थापक शिवाजी निरगुडे व संस्थापक अध्यक्ष कैलास भारती यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली या पतसंस्थेने अल्पावधीतच यशाची शिखरे गाठली आहेत. संस्थेचा रौप्य महोत्सव नुकताच मोठ्या उत्साहात साजरा झाला असून, ही बाब संस्थेच्या भक्कम वाटचालीची साक्ष देणारी आहे, असेही त्यांनी नमूद केले. याप्रसंगी आ. तांबे व कृषीतज्ज्ञ सचिन होळकर यांचा संस्थेच्या वतीने संस्थापक शिवाजी निरगुडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

खासदार तथा संस्थेचे अध्यक्ष भास्कर भगरे हे नियोजित दौऱ्यावर असल्यामुळे कार्यक्रमास उपस्थित राहू शकले नाहीत. या कार्यक्रमाला संस्थापक व शिक्षक नेते शिवाजी निरगुडे, कैलास भारती, उपाध्यक्ष बाळकृष्ण वाजे, कार्यवाह राहुल दवते, संचालक रामराव बनकर, बाळासाहेब गुंजाळ, नगरसेवक साहेबराव बर्डे, किरण जाधव, गणेश महाले, भगीरथ सोनवणे, एन. डी. एस. टी. संस्थेचे संचालक समीर जाधव, माजी नगरसेवक देवदत्त कापसे, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सचिन खडताळे, कृषीतज्ज्ञ सचिन होळकर, बाळासाहेब सोनवणे, सुनील होळकर, राजाभाऊ होळकर, अली शेख, संदीप गिरी, हेमंत खैरनार, व्यवस्थापक रतन दिवटे, ज्ञानेश्वर धाटबळे आदी उपस्थित होते.

# लासलगावमध्ये महिलांचा पतंगोत्सव गोविंदनगरमध्ये मकरसंक्रांती उत्साहात



**लासलगाव (वार्ताहर) :–** चढाओढीनं चढवीत होते गं बाई, मी पतंग उडवीत होते, या गाण्याच्या चालीवर येथील गोविंदनगर परिसरात महिलांनी मकरसंक्रांतीनिमित्त पारंपरिक पद्धतीने पतंग उत्सव साजरा केला.

येवल्यानंतर आता लासलगावमध्येही महिलांनी एकत्र येत मोठ्या उत्साहात पतंग उडवून संक्रांतीचा आनंद साजरा केल्याचे चित्र पाहायला मिळाले. येथील गोविंदनगर परिसरात आयोजित या पतंग उत्सवात महिलांनी पारंपरिक पोशाख परिधान करीत पतंग उडवण्याचा मनमुराद आनंद घेतला. तिळगूळ घ्या, गोड गोड बोला, असे म्हणत एकमेकींना तिळगूळ वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरात आनंद, उत्साह आणि सामाजिक सलोख्याचे वातावरण निर्माण झाले होते.

या पतंग उत्सवात पल्लवी कांगणे, ज्योती कांगणे, पल्लवी तुपे, सोनाली रायते, सुवर्णा गोसावी, निशा पवार व सुजाता वाघचौरे यांच्यासह अनेक महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. महिलांनी एकत्र येत सण साजरा केल्यामुळे पारंपरिक सणांचे महत्त्व अधोरेखित झाले.

मकरसंक्रांतीच्या निमित्ताने महिलांनी घराबाहेर पडून आनंदोत्सव साजरा केल्याने समाजात सकारात्मक संदेश गेला असून, अशा उपक्रमांमुळे महिला सक्षमीकरणाबरोबरच सामाजिक एकोपा अधिक दृढ होत असल्याची भावना यानिमित्ताने व्यक्त केली जात आहे.

# गोंदे फाट्याजवळ तीन टन गोवंश मांस जप्त
## वाहन सोडून चालकाचे पलायन

**सिन्नर (भ्रमर वार्ताहर) :–** नाशिक–पुणे महामार्गावर इनोव्हा कारचा गोरक्षकांनी थरारक पाठलाग करून गोंदे फाट्याजवळ कार अडवली. यावेळी कारमधून सुमारे तीन टन गोमांस जप्त करण्यात आले असून, महामार्गावर कार सोडून चालकाने पलायन केले.

याबाबत माहिती अशी, की संगमनेर येथून नाशिकच्या दिशेने गोवंश जनावरांचे मांसाची वाहतूक होत असल्याची माहिती गोरक्षकांना मिळाली होती. त्यानुसार नांदूरशिंगोटे येथे सापळा रचण्यात आला होता.

संगमनेरकडून येणारी संशयास्पद इनोव्हा कार (क्र. एमएच. ३८ जे ००९९) थांबवण्याचा प्रयत्न केला; मात्र चालकाने वाहन वळवून थेट नांदूरशिंगोटे गावातून पळ काढला. त्यानंतर पुणे महामार्गाने दोडी, दापूर, गोंदे असा थरारक पाठलाग रंगला. प्रचंड वेग आणि वाहनात भरलेला सुमारे तीन टन मांसाचा बोजा यामुळे कारचे तीन टायर फुटले, तरीही चालकाने केवळ डिस्कवर वाहन पळवले.

अखेर गोंदे फाटा परिसरात भारत पेट्रोल पंपाजवळ चालकाने इनोव्हा रस्त्यावरच सोडून पळ काढला. त्यानंतर गोरक्षकांनी नांदूरशिंगोटे पोलीस दूरक्षेत्राला माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत वाहन ताब्यात घेतले. तपासणीदरम्यान मागील सीट काढून प्लास्टिक कव्हरमध्ये भरलेले सुमारे तीन टन गोवंश जनावरांचे मांस आढळून आले. या प्रकरणी वावी पोलीस ठाण्यात इनोव्हा चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. वाहनाची नोंदणी इगतपुरी येथील एका व्यक्तीच्या नावावर असून, संबंधिताने हे वाहन काही महिन्यांपूर्वी संगमनेर येथील सलमान हारून मणियार यास विकल्याचे पोलिसांना सांगितले.

पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवीत संगमनेरमधील मोमिनापुरा भागातून सलमान मणियार याला ताब्यात घेऊन अटक केली. तोच या इनोव्हा कारमधून गोवंश मांसाची वाहतूक करत असल्याचे निष्पन्न झाले आहे. हे मांस नाशिकच्या बागवानपुरा भागात नेले जात होते. पोलिसांकडून अधिक तपास केला जात आहे.

# शिक्षक पात्रता परीक्षेची अंतिम उत्तरसूची होणार प्रसिद्ध

**नाशिक (जिमाका वृत्तसेवा) :–** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत २३ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा पेपर क्रमांक १ व २ ची अंतरिम उत्तरसूची १९ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. याबाबत असलेले त्रुटी व आक्षेपाबाबत १९ डिसेंबर २०२५ पर्यंत निवेदन नोंदविण्याची मुदत देण्यात आली होती. त्यानुसार विहित मुदतीत प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांवर विषयतज्ज्ञांचे अभिप्राय घेऊन अंतिम उत्तरसूची प्रसिद्ध करण्यात येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिद्धिपत्रकान्वये दिली आहे.

या अंतिम उत्तर सूचीबाबत कोणतेही निवेदन वा आक्षेप स्वीकारले जाणार नाहीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# मनमाड नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षपदी मुकुंद एळींजे

**मनमाड (भ्रमर वार्ताहर) :–** मनमाड नगरपरिषदेच्या झालेल्या विशेष सभेत उपनगराध्यक्षपदी भाजपचे मुकुंद एळींजे, तर स्वीकृत नगरसेवकपदी शिवसेनेचे शहरप्रमुख मयूर बोरसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ही निवड पीठासन अधिकारी नगराध्यक्ष योगेश पाटील यांनी जाहीर केली.



पालिका प्रशासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात झालेल्या विशेष सभेत उपनगराध्यक्षपदासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल झालेल्या एकमेव नामनिर्देशन अर्जानुसार भाजपचे मुकुंद एळींजे यांची निवड जाहीर करण्यात आली. तसेच स्वीकृत नगरसेवकपदासाठीही एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने शिवसेनेचे शहरप्रमुख मयूर बोरसे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

या सभेचे कामकाज पीठासीन अधिकारी म्हणून नगराध्यक्ष योगेश पाटील यांनी पाहिले. यावेळी मुख्याधिकारी शेषराव चौधरी उपस्थित होते. दोन स्वीकृत नगरसेवकपदांची निवड प्रभाग क्रमांक १० ची निवडणूक झाल्यानंतर होणार असल्याने या पदासाठी इच्छुक असलेल्या अनेकांच्या अपेक्षांवर पाणी फिरले. सध्या पालिकेत सत्ताधारी गटाकडे शिवसेनेचे २१, भाजपचा १ व रिपाइंचे २ असे एकूण २४ नगरसेवक होते. दरम्यान, काँग्रेसचा १ व १ अपक्ष नगरसेवक शिवसेनेत प्रवेश केल्याने सत्ताधारी गटाचे संख्याबळ २६ झाले आहे. विरोधी बाकांवर शिवसेना ठाकरे गटाचे ४ व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा १ नगरसेवक आहे.

# आयसीएआयकडून विद्यार्थ्यांना सीए अभ्यासक्रमासाठी प्रोत्साहन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट ऑफ इंडिया अर्थात आयसीएआयच्या वेस्टन इंडिया रिजनल कौन्सिलकडून विद्यार्थ्यांमध्ये सीए अभ्यासक्रमाबाबत जनजागृती निर्माण व्हावी, यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. या उपक्रमांची माहिती देण्यासाठी वेस्टन इंडिया रिजनल कौन्सिलचे अध्यक्ष केतन सैया यांनी नाशिक ब्रांचला भेट दिली. यावेळी सीए पीयूष चांडक आणि श्वेता जैन हे सदस्य उपस्थित होते.




यावेळी सैया यांनी सांगितले, की भारताने शून्याचा शोध लावला. त्याचप्रमाणे अकाऊंटिंच्या विकासामध्ये मोलाचे योगदान आहे. ही गोष्ट लोकांपर्यंत पोहोचावी, यासाठी कौन्सिलकडून रिजनलमधील ५० शाळा, महाविद्यालयांमध्ये अकाऊंटिंग म्युझियम उभारणीचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. याअंतर्गत शहरातल्या बीवायके कॉलेजमध्ये अकाऊंटिंग म्युझियमची निर्मिती करण्यात आली आहे. सोबतच नाशिक ब्रँचमध्ये ई–लायब्ररीचा देखील शुभारंभ करण्यात आला आहे. नाशिक ब्रांचकडून एमएसएमई अर्थात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी दर शुक्रवारी मोफत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यात पॅनकार्ड, उद्यम कार्ड, पार्टनरशिपसंदर्भातील कायदेशीर तरतुदी यावर दुपारी ४ ते सायंकाळी ५ यावेळेत सल्ला दिला जाणार आहे. लाभ उद्योजकांनी घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी आयसीएआय नाशिकचे अध्यक्ष जितेंद्र फाफट, उपाध्यक्ष अभिजीत मोदी, खजिनदार विशाल वाणी आदींसह सदस्य रोहन कुलकर्णी, शुभम् मुंदडा, आयसीएआय नाशिक विकासा कमिटीचे अध्यक्ष दिलीप बोरसे उपस्थित होते.

# डोळ्यांची काळजी, नेत्रदान विषयावर कार्यशाळा



**सातपूर (भ्रमर प्रतिनिधी) :–** भारतात अडीच कोटींपेक्षा जास्त नागरिकांना नेत्रदानाची आवश्यकता आहे. मरणोत्तर नेत्रदान केल्याने अडीच कोटी जनतेच्या जीवनात प्रकाश येईल. नागरिकांना नेत्रदानाचे महत्त्व समजावून सांगावे, असे आवाहन जिल्हा शासकीय रुग्णालयातील नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. सुनील चौधरी यांनी केले.

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांसाठी डोळ्यांची काळजी व नेत्रदान या विषयावर संस्थेत स्वच्छता निरीक्षक कोर्सच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. डॉ. चौधरी यांनी पुढे सांगितले, की आपल्या शरीरात डोळ्यांना ७० टक्के महत्त्व आहे. त्यामुळे आपण दैनंदिन कामकाज सहजतेने करू शकतो. डोळ्यांमुळेच आपला जगाशी संपर्क राहतो. नियमित नेत्रतपासणी, संतुलित आहार, पुरेशी झोप, मोबाईल स्क्रीन टाईम कमी करणे याबाबतची माहिती दिली. भारतात अडीच कोटींपेक्षा जास्त व्यक्तींना अशा नेत्रदानाची आवश्यकता आहे. मरणोत्तर नेत्रदान ही अत्यंत सोपी प्रक्रिया असून, यात कोर्निया काढून दुसऱ्या व्यक्तीला बसविला जातो. डोळे हे सर्वांत महत्त्वाचे पंचेंद्रिय असून, त्याची काळजी घेणे गरजेचे आहे, असे कोर्स युनिट हेड अक्षदा आहेर यांनी प्रास्ताविकात सांगितले. स्वागत व सत्कार विभागीय संचालक जीवन सोनवणे यांनी केला. प्राचार्य डॉ. के. एम. सोनवणे यांनी पाहुण्यांच्या परिचय करून दिला. या कार्यशाळेत स्वच्छता निरीक्षक कोर्सचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

# दिव्यांग बालकांची आगळीवेगळी सेवा




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** सामाजिक बांधिलकी जपायची इच्छा असली, की कोणत्याही पद्धतीने सेवा करता येते. त्यांचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे 'हेअर बुक युनिसेक्स सलोन'चे साहिल बागवले व नीतूताई बागवले यांनी विकास मंदिर शाळा, नाशिकरोड येथे दिव्यांग बालकांची विनामूल्य 'केस कर्तन सेवा' सुरू केली. त्यांनी हा आगळावेगळा उपक्रम हाती घेऊन दिव्यांग बालकांना खूश केले.

राजमाता जिजाऊ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त या महान विभूतींना प्रणाम करीत या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

संस्थेच्या सचिव डॉ. सुहासिनी घोडके यांनी या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे स्वागत केले व शाळेत प्रथमच असा उपक्रम राबविल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. त्यानंतर श्रीमती शोभाताई जमधाडे आणि परिवाराने विद्यार्थ्यांना ब्लँकेट्स आणि बिस्किट्स वितरण केले. स्व. इंदिरा अय्यर यांचे प्रथम स्मृतिदिनाच्या निमित्ताने व स्व. बाबूराव भिका अहिरे यांचे दहावा स्मृतिदिनाच्या निमित्ताने त्यांचे आठवणींना उजाळा देत अभिवादन करण्यात आले. चि. अधिराज पाटील याचा वाढदिवस साजरा करताना दिव्यांग बालकांनी विविध गुणदर्शन सादर करित शुभेच्छा व्यक्त केल्या.

सनया मिस्त्री यांनी स्व. इंदिरा अय्यर यांचे स्मृतिप्रीत्यर्थ दिव्यांगांना सुग्रास भोजन दिले. या प्रसंगी आयटी इंजिनिर चंद्रशेखर महाले, शोभाताई रवींद्र पाटील काजल देवेंद्र पाटील, वर्षा जमधाडे, ओम् जमधाडे, प्राजक्ता जमधाडे आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कमल उबाळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर संस्थेचे खजिनदार दीपक मगर यांनी संस्थेच्या वतीने आभार व्यक्त केले.

● **नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** महानगरपालिका निवडणुकीत अनेक दिग्गजांना मतमोजणीत कमी मते मिळाल्यामुळे धक्का बसला. त्यामुळे सर्वत्र 'कही खुशी, कही गम' असे वातावरण होते.

# उद्या स्वर सावाना कार्यक्रमाचे आयोजन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने स्वर सावाना मासिक सांस्कृतिक (सांगीतिक) कार्यक्रमाचे १८ वे पुष्प उद्या (दि. १७) सायंकाळी ६.१५ वाजता, मु. शं. औरंगाबादकर सभागृहात होत आहे.

अविष्कार प्रस्तुत रागरंग या कार्यक्रमातून नाट्य, अभंग आणि भाव हे मुंबईच्या गायिका वर्षा सोहनी या सादर करणार आहेत. त्यांना हार्मोनियमवर दिव्या जोशी–रानडे, तर रसिक कुलकर्णी हे तबल्यावर साथसंगत करणार आहेत.

संकल्पना सार्वजनिक वाचनालयाची असून, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके, कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सिग्मा सायन्स अॅकॅडमीचे संस्थापक अतुल कुलकर्णी व दुहिता अतुल कुलकर्णी उपस्थित राहणार आहेत. सावाना सभासद स संगीतप्रेमी रसिकांनी या विनामूल्य कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सावानाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके, उपाध्यक्ष वैद्य विक्रांत जाधव, डॉ. सुनील कुटे, कार्याध्यक्ष संजय करंजकर, प्रमुख सचिव सुरेश गायधनी, सहा. सचिव प्रा. सोमनाथ मुठाळ, ग्रंथसचिव देवदत्त जोशी, अर्थ सचिव गिरीश नातू, नाट्यगृह सचिव जयेश बर्वे, सांस्कृतिक कार्य सचिव जयप्रकाश जातेगावकर, वस्तुसंग्रहालय सचिव अॅड. अभिजित बगदे, सदस्य प्रेरणा बेळे, डॉ. धर्माजी बोडके, प्रशांत जुन्नरे, मंगेश मालपाठक व अॅड. भानुदास शौचे यांनी केले आहे.

# कसमादे मराठा उत्कर्ष संस्थेच्या वतीने राजमाता जिजाऊ यांना अभिवादन




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त कसमादे मराठा उत्कर्ष संस्थेच्या वतीने गंगापूर रोडवरील चैतन्यनगर येथील चौकात अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. बी. जी. वाघ होते. सेवानिवृत्त प्राचार्य बी. के. थोरात हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य थोरात म्हणाले, की राजमाता जिजाऊ या केवळ एका महान योद्ध्याच्या माता नव्हत्या, तर त्या संस्कारांची, शौर्याची आणि राष्ट्रभक्तीची जिवंत शाळा होत्या. त्यांनी शिवरायांच्या मनात धर्म, स्वराज्य आणि माणुसकीची बीजे पेरली. आजच्या पिढीने त्यांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी, असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमास संस्थेच्या महिला भगिनींचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष हिरामण सोनवणे, पंडित वाघ, रमेश खैरनार, रवींद्र निकम, कार्याध्यक्ष गुलाबराव भामरे, सचिव डॉ. प्रशांत सूर्यवंशी, विनित पवार, प्रमोद अहिरराव, शिवराम हिरे, एन. डी. पवार, चंद्रशेखर सोनवणे, संजय अहिरराव, डॉ. खैरनार, नीलेश पाटील, दीपक चव्हाण यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. विनित पवार यांनी सूत्रसंचालन केले. दिलीप अहिरे यांनी आभार मानले. प्रमोद अहिरराव यांनी परिश्रम घेतले.

# देवळ्यात सांस्कृतिक कार्यक्रमातून जोपासली संस्कृती

**देवळा (भ्रमर वार्ताहर) :–** गणेशवंदना, ऑपरेशन सिंदूर, गुजराती थीम, बंगाली, राजस्थानी, पंजाबी, टुकुर टुकूर, लक्ष्मीकांत बेर्डे मानवंदना, छावा नाटिकेचे सादरीकरण, अहिराणी नृत्य, खानदेशी नृत्य, नरसिंहा, काश्मीर नृत्य, देश रंगीला, साऊथ, शिवकन्या, फुलवंती, मल्हारी खंडोबा रायाचा, रांझेगावचा पाटील आणि आई–वडिलांचे महत्त्व जिवंत ठेवत तालुक्यातील विठेवाडी येथील डॉ. डी. एस. आहेर इंग्लिश मीडियम पब्लिक स्कूल, लिटल एंजल स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये झालेल्या दौलत कार्निवलचे सांस्कृतिक कार्यक्रमातून संस्कृतीचे परंपरा जोपासत चिमुकल्यांनी उपस्थित प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले.

देवळा तालुक्यातील विठेवाडी येथील स्कूल, लिटल एंजल स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रमेश शिरसाठ होते.

प्रमुख अतिथी म्हणून प्रमोद रौंदळ, रील स्टार टन मारी धुराट आणि श्री रामकृष्ण हरी भूषण दादा बच्छाव, अमोल सोनजे आदींसह संस्थेचे चिटणीस कृष्णा बच्छाव, प्रशांत आहेर, चित्रा देशमुख, डॉ. सुभाष आहेर, प्रशासकीय अधिकारी दिनकर देवरे, शंकर निकम, विलास निकम, दिलीप मेधने, प्राचार्य व्ही. एम. ठाकरे, शरद पवार, सोपान सोनवणे, पंडित पाठक यांचेसह पालक उपस्थित होते. लिखिता पवार व प्रियंका अहिरे यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य बी. के. पाटील यांनी केले. यावेळी त्यांनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, विज्ञान प्रदर्शन आदी कार्यक्रमाचा अहवाल सादर केला.




विठेवाडी येथील डॉ. डी. एस. आहेर इंग्लिश मीडियम पब्लिक स्कूलमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम सादर करताना विद्यार्थी.

रमेश शिरसाठ व विलास रौंदळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. दीपाली भालेराव, कल्पना नंदाळे, सारिका निकम आणि मयूर ठाकरे , सांस्कृतिक विभागप्रमुख हर्षद बच्छाव, समन्वयक उमेश देवरे, पर्यवेक्षक सी. जी. खैरनार, मनोज शेवाळे, शुभांगी सावंत, अनुजा आहेर आदींसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# देवळा येथे मुलींसाठी व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम

**देवळा (भ्रमर वार्ताहर) :–** येथील कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ स्टुडंट डेव्हलपमेंट यांच्या निर्भय कन्या अभियानांतर्गत मुलींसाठी व्यक्तिमत्त्व विकास शिबिर घेण्यात आले होते. या कार्यक्रमाचा विषय मेडिटेशन फॉर मेंटल पीस असा होता.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हितेंद्र आहेर होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. मालती आहेर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या वक्त्या म्हणून आध्या दासाजी यांनी विद्यार्थिनींना ध्यान, मानसिक शांतता व आत्मविश्वास वाढविण्याबाबत मार्गदर्शन केले.

डॉ. जयमाला चंद्रात्रे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रास्ताविक डॉ. दीपिका शिंदे यांनी केले. वक्त्या आध्या दासाजी यांनी ध्यानधारणेचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून विद्यार्थिनींना तणावमुक्त जीवनशैलीचे महत्त्व पटवून दिले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. हितेंद्र आर. आहेर यांनी निर्भय कन्या अभियानामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास, सुरक्षिततेची भावना व नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत होते, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# संपादकीय

## अत्याचारपीडित महिला

महिलांच्या संरक्षणविषयक कायदे कितीही कडक केले, तरी महिलांवरील अत्याचार हा मानवतेचा प्रश्न असताना तो भारतात जात, धर्म आणि पक्ष यांच्या चष्म्यातून पाहिला जातो. त्यामुळे पीडितेचा आवाज दाबला जातो आणि अत्याचाराला सापेक्षतेचे कवच मिळते. महिलांवरील अत्याचार हा मानवतेचा प्रश्न असताना तो भारतात जात, धर्म आणि पक्ष यांच्या चष्म्यातून पाहिला जातो. त्यामुळे पीडितेचा आवाज दाबला जातो आणि अत्याचाराला सापेक्षतेचे कवच मिळते. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' असे एक संस्कृत वचन एकदा उच्चारले की, भारतीय महिलांविषयी रम्य, सुशील, पवित्र, दिव्य असे, जगात कुठेही अकल्पनीय असलेले चित्र उभे केल्याचा आणि आपली संस्कृती किती महान आहे याचा परमोच्च आनंद आपले भारतीय लोक घेत असतात. असे असले तरी महिलांवरील अत्याचारात, विशेषतः लैंगिक अत्याचारात दिवसेंदिवस वाढच होत चालली आहे. मुळात असे अत्याचार करणे ही विकृतीच; परंतु गेल्या काही काळात या विकृतीने एवढे भयानक आणि बीभत्स स्वरूप घेतले आहे, की आपण स्वतःला माणूस म्हणवून घेण्याची शरम वाटावी. दिल्लीत सन २०१२ मध्ये घडलेले निर्भया अत्याचार प्रकरण कोणीही संवेदनशील व्यक्ती विसरू शकणार नाही. सन २०१२ मध्ये दिल्लीतील निर्भयावर झालेल्या अत्याचाराचे वर्णन वाचून लोक प्रचंड अस्वस्थ झाले आणि देशभरात रस्त्यावर उतरले. विशेषतः दिल्लीत तर अभूतपूर्व अशी निदर्शने झाली. सर्व जाती-धर्मातील लोक यात सामील झाले. या अत्याचाराची आणि त्याविरुद्ध झालेल्या आंदोलनाची तीव्रता एवढी होती की सन २०१३ मध्ये फौजदारी कायद्यात सुधारणा होऊन कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आणि बलात्कार, अन्य लैंगिक अत्याचारांच्या व्याख्येची व्याप्ती वाढवली गेली. निर्भया प्रकरण घडण्यापूर्वी सन २००६ मध्ये भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी येथे भोतमांगे कुटुंबातील चौघा कुटुंबीयांची अनेक ग्रामस्थांकडून अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली. त्यात एक महिला आणि तिची मुलगी यांचा समावेश होता. या दोघींची नग्नावस्थेत गावातून धिंड काढून, त्यांच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला होता. हा प्रकार उघडकीस आल्यावर त्या विरोधात फक्त अत्याचारपीडित कुटुंबीयांच्या जातीच्या लोकांकडूनच महाराष्ट्रातील काही भागात आंदोलने झाली. आंदोलन करणाऱ्यांच्या नशिबी पोलीस केसेसचा ससेमिरा मागे लागला आणि काहींचे करिअर त्यात बरबाद झाले. हे बळी पडलेले कुटुंब अनुसूचीत जातीचे होते. अनुसूचित जाती-जमातीच्या महिलांवरील अत्याचाराच्या बाबतीत असलेली अन्य लोकांची उदासीनता ही तशी नवी नाही. दिल्लीचे निर्भया प्रकरण, तेलंगणातील महिला पशूवैद्य प्रकरण, महाराष्ट्रातील कोपर्डी प्रकरण आणि अन्य प्रकरणांत समाजमन जेवढे ढवळून निघाले, जेवढा आक्रोश निर्माण झाला तेवढा खैरलांजी, हाथरस आणि अन्य प्रकरणांत निर्माण झाला नाही. यातून महिलांवरील अत्याचारांच्या बाबतीत एक परंपरागत सापेक्षता दिसून येत आहे ती आहे जात-सापेक्षता. अशा प्रकरणाला बळी पडलेले दुर्दैवी जीव हे जातीयदृष्ट्या हलक्या जातीचे होते, हे वास्तव लपविता येणार नाही.

# नाशिक जिल्हा रुग्णालयाला 'लक्ष्य' अंतर्गत राष्ट्रीय मानांकन

## राज्यातील एकमेव सार्वजनिक आरोग्य संस्था ठरली

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** प्रसूती दरम्यान तसेच प्रसूतीनंतर माता व नवजात बाळांना सुरक्षित, सन्मानजनक व गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा देण्यासाठी भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या 'लक्ष्य' या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमांतर्गत नाशिक जिल्हा रुग्णालयास राष्ट्रीय दर्जाचे मानांकन प्राप्त झाले आहे. या मानांकनामुळे महाराष्ट्र राज्यातील एकमेव सार्वजनिक आरोग्य संस्था म्हणून नाशिक जिल्हा रुग्णालयाने मानाचा ठसा उमटविला आहे.

'लक्ष्य' कार्यक्रमाचा मुख्य उद्देश सार्वजनिक रुग्णालयांमधील प्रसूती कक्ष, मातृत्व ऑपरेशन थिएटर व नवजात शिशु काळजी कक्षांची गुणवत्ता सुधारून माता व बालमृत्यू दरात घट करणे हा आहे. या अंतर्गत आधुनिक वैद्यकीय सुविधा, प्रशिक्षित मनुष्यबळ, स्वच्छता, संसर्ग प्रतिबंध, वेळेवर उपचार व रुग्णांशी सन्मानजनक वागणूक अशा विविध निकषांवर नाशिक जिल्हा रुग्णालयाने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. केंद्रीय निरीक्षण पथकाने सुमारे १२,००० प्रश्नांवर आधारित निकषांनुसार प्रसूती कक्ष, मातृत्व ऑपरेशन थिएटर, मनुष्यबळ कौशल्य, प्रशिक्षण, उपकरणे, पायाभूत सुविधा व कार्यप्रणाली सुधारणा यांची सखोल तपासणी केली. या तपासणीत नाशिक जिल्हा रुग्णालयाने ८९ टक्के गुण प्राप्त करून 'लक्ष्य' राष्ट्रीय मानांकन मिळविले आहे. हे मानांकन पुढील तीन वर्षांसाठी वैध असणार आहे.

मागील वर्षी नाशिक जिल्हा रुग्णालयाने राज्यस्तरावर 'लक्ष्य' कार्यक्रमात प्रथम क्रमांक पटकावला होता. यावर्षी महाराष्ट्रातून राष्ट्रीय स्तरावर नामांकन मिळविणारी ही एकमेव संस्था ठरली आहे. या यशामुळे नाशिक जिल्ह्यातील गर्भवती महिला व नवजात बाळांना अधिक सुरक्षित, दर्जेदार व विश्वासार्ह आरोग्यसेवा उपलब्ध होत असल्याचे अधोरेखित झाले आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसूती कक्षाचे सुसज्जीकरण, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, गुणवत्ता तपासणी व सेवा सुधारणा यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात आले. या यशात अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नीलेश पाटील, डॉ. बाळू पाटील, डॉ. संदीप सूर्यवंशी, 'लक्ष्य' नोडल अधिकारी डॉ. अनंत पवार, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रमोद चौधरी, डॉ. रोहन बोरसे, अनिता भालेराव, परिचारिका व इतर कर्मचारी, हॉस्पिटल मॅनेजर डॉ. दीपाली भामरे, तसेच नर्सिंग कॉलेजचे सतीश वाघमारे व अभिषेक गोसावी यांचे योगदान लाभले. नाशिक जिल्हा रुग्णालयातील संपूर्ण टीमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे व गुणवत्तापूर्ण सेवेमुळे 'लक्ष्य' अंतर्गत राष्ट्रीय मानांकन मिळाले आहे. गर्भवती महिला व नवजात बाळांसाठी सुरक्षित, दर्जेदार व सन्मानजनक आरोग्यसेवा देण्याच्या आमच्या प्रयत्नांचे हे मोठे यश आहे, असे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे म्हणाले.

# विनोबा ॲपमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांचा गौरव

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** जिल्हा परिषद नाशिकअंतर्गत आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रम हा विनोबा ॲपच्या माध्यमातून प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमधील शिक्षक आपल्या शाळांमध्ये राबविण्यात येणारे नावीन्यपूर्ण उपक्रम, शैक्षणिक व पाठ संसाधने, तसेच विविध शैक्षणिक साधनांचा प्रभावी वापर करून अध्ययनह्नअध्यापन प्रक्रिया अधिक सुलभ व गुणवत्तापूर्ण करीत आहेत. या उपक्रमांद्वारे शिक्षकांनी केलेले उत्कृष्ट कार्य विनोबा ॲपच्या माध्यमातून इतर शिक्षकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे.





या उपक्रमांतर्गत ओपनलिंक्स फाऊंडेशनकडून उपक्रमशील शिक्षकांची नोंद घेण्यात येते. त्यानुसार दरमहा उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्या हस्ते गौरव करण्यात येतो.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या हस्ते पोस्ट ऑफ द मंथ तसेच स्पेलिंग बी, स्पोकन इंग्लिश, कवितावाचन, कथा वाचन आणि चावडी वाचन या विविध क्लबमधील विजेत्या शिक्षकांचा गौरव करण्यात यावेळी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी उपस्थित शिक्षकांशी संवाद साधत एफ.एल.एन., नवोदय, शिष्यवृत्ती परीक्षा तसेच सीडब्ल्यूएसएन या विषयांवर सखोल चर्चा केली. संवादादरम्यान त्यांनी शिक्षकांसमोर पुढील त्रिसूत्री मिशन मांडले. ह्न

राज्य शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढविणे, सीएसआर व लोकसहभागाच्या माध्यमातून शाळेचा सर्वांगीण विकास करणे, सडब्ल्यूएसएन विद्यार्थ्यांना सक्षमपणे घडविणे. ही तीनही महत्त्वाची उद्दिष्टे शिक्षकांच्या माध्यमातून प्रभावीपणे साध्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. यावेळी सरोज जगताप, विस्तार अधिकारी (प्राथमिक) संतोष झोले, तसेच ओपनलिंक्स फाऊंडेशनकडून राकेश जी महाजन व राकेश डी. महाजन उपस्थित होते.

पोस्ट ऑफ द मंथ विजेते शिक्षक पावरा जि. प. प्रा. शाळा, ओझर टाऊनशिप, निफाड निलोफर तांबोळी, जि. प. प्रा. शाळा, सुतारखेडे, चांदवड, सुनंदा बिरारी, जि. प. प्रा. शाळा, करंजाळी, ता. पेठ, अभिमान पिंपळसे, जि. प. प्रा. शाळा, शेरी, देवळा, उज्ज्वला महाजन जि. प. प्रा. शाळा, खादगाव, नांदगाव.

क्लब विजेते शिक्षक

ज्योती ठाकरे, जि. प. प्रा. शाळा, मुंढेगाव, इगतपुरी, अमोल वानखेडे, जि. प. प्रा. शाळा, हिंग्नगर, नांदगाव, अभिमन्यू गवळी, जि. प. प्रा. शाळा, चिराई, सुरगाणा, सोनाली दंडगव्हाळ, जि. प. प्रा. शाळा, कुलधरवस्ती, येवला, रमेश झोले, जि. प. प्रा. शाळा, नैताळे, निफाड, अर्चना पवार, जि. प. प्र. शाळा, झोडगे (मुले), मालेगाव, मनीषा पाटील, जि. प. प्रा. शाळा, कौळाणे (गा.), मालेगाव, ज्योती कुलधर, जि. प. प्रा. शाळा, न्याहारखेडे खुर्द, येवला.

## सुकाकाथ मसाला

### टक्कल

शिक्षक वर्गात मुलांना सांगत होते, ''मुलांनो, जर कोणी बुडत असेल तर त्याचे केस पकडून त्याला बाहेर काढायला हवं. हे तत्त्व एकदा तुम्हाला समजलं की तुम्ही कोणालाही वाचवू शकता.''

एक विद्यार्थी म्हणाला, ''सर, तरी सगळ्याच माणसांना असं वाचवता येणार नाही.'' शिक्षकांनी विचारले, ''का? का वाचवता येणार नाही?'' विद्यार्थी म्हणाला, ''सर, जी माणसं टकली असतील त्यांना कसं वाचवणार?''

– पानवाला

## खाण्यासाठी चेंज हवा?

### रुमाली वड्या

**साहित्य :-** रोलसाठी-एक वाटी बेसन, चवीप्रमाणे तिखट, मीठ, हींग, हळद, चिमूटभर साखर. सारणासाठी- एक वाटी सुक्या खोबऱ्याचा किस (ओले खोबरेही वापरू शकता), एक टेबलस्पून तीळ, तेवढीच खसखस, चिमूटभर ओवा, लाल तिखट, मीठ, बारीक चिरलेली कोथिंबीर, तेल.

**कृती :-** सारणासाठीचे खसखस, तीळ व ओवा हे जिन्नस खमंग भाजून घ्या. सुकेखोबरे व कोथिंबीर दोन्ही खमंग भाजून घ्या. खोबरे व तीळ वगैरे मिक्सरमधून हलकेच फिरवून घ्या. त्यात तिखट मीठ वगैरे घालून तिखट सारण करून घ्या. दोन वाटी पाण्यात रोलचे साहित्य नीट मिसळून घ्या. एका जाड बुडाच्या भांड्यात थोडेसे तेल घालून रोलचे मिश्रण ओता. सतत ढवळत शिजवा. गोळा जमू लागला, की मिश्रण प्लास्टीकच्या कागदावर एका बाजूला ते मिश्रण ओता. त्यावर बाकिचा कागद झाकून लाटण्याने भराभर लंबगोल लाटून घ्या. साधारण अर्धा सेमी जाडी ठेवा. त्यावर झटपट सारण पसरून घ्या व परत एकदा लाटणे फिरवा. एका बाजूने कागद उचलून रोल करायला घ्या. वळकटीला साधारण त्रिकोणी आकार येऊ द्या. हा रोल पूर्णपणे गार होऊ द्या. मग धारदार सुरीने त्याच्या एक सेमी जाडीच्या चकत्या कापा. तव्यावर तेल टाकून या चकत्या नाजूक हाताने परतून घ्या.

– ऐश्वर्या राजेंद्र काळे

# नायलॉन मांजामुळे लासलगावला शेतकऱ्याच्या गळ्याला बारा टाके


**लासलगाव (भ्रमर वार्ताहर) :-** बंदी असलेल्या नायलॉन मांजाचा वापर पुन्हा एकदा जीवघेणा ठरला. लासलगाव जवळील कोटमगाव (ता. निफाड) येथील शेतकरी अंबादास दादासाहेब काळे (वय ५४) यांना नायलॉन मांजामुळे गंभीर दुखापत झाली असून त्यांच्या गळ्याला बारा टाके घालावे लागले आहेत.



अंबादास काळे हे शेतीची अवजारे खरेदी करण्यासाठी लासलगाव येथे आले होते. लासलगाव स्टेशन येथून गावात येत असताना एसटी बस डेपोजवळून जात असताना रस्त्यावर अडकलेला बंदी असलेला नायलॉन मांजा अचानक त्यांच्या गळ्याला लागला. यामध्ये त्यांच्या गळ्याला खोल जखम झाली असून, अन्ननलिका व श्वासनलिकेपर्यंत गंभीर इजा झाल्याचे कृष्ण हॉस्पिटलचे संचालक डॉ. योगेश चांडक यांनी सांगितले. या घटनेनंतर काळे यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे त्यांच्या गळ्यावर बारा टाके घालण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून पुढील उपचार सुरू आहेत.

या घटनेमुळे लासलगाव शहरात बंदी असलेल्या नायलॉन मांजाचा सर्रास वापर पुन्हा सुरू असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. लासलगाव ग्रामपंचायत व पोलीस प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अंबादास काळे यांच्या कुटुंबीयांनी नायलॉन मांजाविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## भ्रमर शब्दकोडे क्र. ३८७



**उभे शब्द :** १) महाराष्ट्रातील एक सर्वात उंच शिखर २) आठवण (हिंदीत) ३) उन्हाळ्यात थंड हवा येण्यासाठी हा वापरतात ४) मोहरा या हिंदी चित्रपटातील अभिनेत्री ५) कष्टप्रद स्थिती ६) बशीचा जोडीदार १०) दहा (हिंदीत) ११) भाजपचे निवडणूक चिन्ह १३) वृत्तपत्र (हिंदीत) १६) नवमी नंतरचा दिवस १८) हाताची नाडी २०) एक म्हण- ** ** ते स्वप्नी दिसे २२) सायकलच्या या चाकावर टायर बसवितात २४) मोठा तीळ २५) आकाश (इंग्रजीत) २७) याच्यावर भाकरी अथवा चपाती भाजतात २८) मादीच्या विरूध्दार्थी शब्द २९) मोकळा वेळ, फुरसत ३१) इंद्राचा हत्ती ३२) पूर्वी राजेशाहीत वाजवला जायचा तो मोठा ढोल ३३) नवा कोरा ३५) प्राण्यांचा समूह ३७) खांब ३८) खोली (हिंदीत) ४१) स्वस्तच्या विरूध्दार्थी ४२) चौघड्याच्या जोडीचे वाद्य ४७) शिक्षा, शासन ४८) भाविक भक्तांचे पंढरीला पायी जाणे

**आडवे शब्द :** १) दिल्लीच्या जेएनयु विद्यापीठातून पुढे आलेला युवा नेता, सध्या राहुल गांधींबरोबर काँग्रेसमध्ये आहे ५) गुजरातमधील एक युवा नेता-*** पटेल ७) पथक, सैन्याची तुकडी ८) भव्य, अथांग, मुलाचे एक नाव ९) मेडल (मराठीत) १२) मांडणी, वस्तूंची ठेवण १४) विषमच्या विरूध्दार्थी शब्द १५) ढग (हिंदीत) १७) टायपिंग (मराठीत) २०) देव, देवाची प्रार्थना-**स्तवन २०) रायगड जिल्ह्यातील एक तालुका २१) श्रीकृष्णाचा पावा २३) एकमेकाला केलेले वंदन, प्रणाम २६) निवडणुकीत हे उमेदवाराला देतात, व्होट २८) इच्छापूर्तीसाठी देवाला घातलेले साकडे ३०) दुधावरील मलई ३२) नगरपालिकेवर वॉर्डमधून निवडून दिलेला लोकप्रतिनिधी ३४) अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष-*** ओबामा ३६) भित्रा (हिंदीत) ३९) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४०) रिपाइंचे नेते-**** आठवले ४३) लेखणी (हिंदीत) ४४) बारा वर्षांचा काळ ४५) लग्नातील वधू ४६) धान्याचा ढीग ४०) गाणे गाणारा, गायक ५०) जरचा जोडीदार ५१) इंग्रजी वर्षाच्या सुरूवातीचा महिना

### शब्दकोडे क्र. ३८६ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गो | पा | ळ | का | ला | | व | | पा | वा |
| व | | | लि | | अ | सु | र | | रा |
| र्ध | | मा | या | वी | | दे | व | की | |
| न | | ठ | | | | व | | | स |
| | कं | | य | मु | ना | | ब | | म |
| रा | स | | शो | | | | ल | गो | र |
| जा | | सु | दा | मा | | मी | रा | | |
| | नं | द | | व | न | | म | थु | रा |
| | | र्श | | शी | | व | | | धा |
| अ | र्जु | न | | | सा | र | थी | | |

# लोहोणेर जनता विद्यालयाचा पर्यावरणपूरक संकल्प

**देवळा (भ्रमर वार्ताहर) :-** लोहोणेर येथील मविप्र समाज संस्थेच्या जनता विद्यालयात मकरसंक्रांत सणानिमित्त सुरक्षितता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा उपक्रम राबविण्यात आला. शाळेतील एकूण १०५० विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी एकत्र येत नायलॉन मांजा न वापरण्याची शपथ घेतली.



मकरसंक्रांत सणात मुलांना पतंग उडविण्याची प्रचंड आवड असते; परंतु बाजारात मिळणारा नायलॉन मांजा हा पशू-पक्षी व मानव जीवनासाठी अत्यंत घातक आहे, याची जाणीव मुख्याध्यापिका कल्पना शिंदे यांनी विद्यार्थ्यांना करून दिली. नायलॉन मांजा हा धारदार आणि बळकट असल्याने दरवर्षी अनेक पक्ष्यांचे जीव जातात, तसेच रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनधारकांना गंभीर दुखापती होतात, हे त्यांनी स्पष्ट केले. त्या म्हणाल्या, की आपल्या आनंदामुळे दुसऱ्यांचे नुकसान होऊ नये, ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. सुरक्षितता आणि पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा करणे ही काळाची गरज आहे. संक्रांतीचा सण केवळ पतंग उडविण्यापुरता मर्यादित नसून, त्यामागे सांस्कृतिक आणि आरोग्यविषयक संदेशही दडलेला आहे.

मुख्याध्यापिका शिंदे यांनी मकरसंक्रांत साजरी करण्यामागील सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व सांगितले आणि सुरक्षित संक्रांत साजरी करण्याचे आवाहन केले. यानंतर सांस्कृतिक समितीप्रमुख सुनील एखंडे यांनी विद्यार्थ्यांना व उपस्थित शिक्षकवृंद व शिक्षकेतर सेवक वृंद यांना नायलॉन मांजा वापरणार नाही, तसेच इतरांनाही वापरण्यास प्रवृत्त करणार नाही, अशी शपथ देत पर्यावरणपूरक संकल्प सर्वांनी एकमताने केला. पर्यवेक्षक विलास निकम यांच्यासह सर्व शिक्षकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. शाळेत घेतलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण-जागरुकता, सुरक्षितता व सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण झाली.

# सिकलसेलमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने 'अरुणोदय' मोहीम

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्हा रुग्णालयात सिकलसेल निर्मूलन कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत असून, सिकलसेल आजाराचे प्रमाण अधिक असलेल्या राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये 'अरुणोदय' ही विशेष सिकलसेल तपासणी मोहीम १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. अरुणोदय-सिकलसेलमुक्त भविष्यासाठी, आदिवासी आरोग्यासाठी या घोषवाक्याखाली तपासणीसोबतच जनजागृतीवर विशेष भर देण्यात येत आहे. ही मोहीम सिकलसेलमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने टाकलेले निर्णायक पाऊल ठरणार असल्याचे जिल्हा रुग्णालयातील रक्तविज्ञान विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. चंद्रशेखर आवारे यांनी सांगितले.

**सिकलसेल आजाराचे स्वरूप**

सिकलसेल ॲनिमिया हा एक आनुवंशिक रक्तविकार असून, तो आई-वडिलांकडून मुलांमध्ये पिढ्यान्‌पिढ्या संक्रमित होतो. या आजारात तांबड्या रक्तपेशींचा आकार बदलून त्या कोयत्याच्या पात्यासारख्या होतात. त्यामुळे रक्तप्रवाहात अडथळे निर्माण होऊन शरीराच्या विविध अवयवांवर गंभीर परिणाम होतो. आदिवासी व दुर्गम भागांमध्ये या आजाराचे प्रमाण अधिक आढळून येते.

**सिकलसेलचे दोन प्रकार**

सिकलसेल वाहक या व्यक्तींमध्ये सहसा कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत किंवा अत्यंत सौम्य लक्षणे असतात; मात्र पुढील पिढीमध्ये सिकलसेल आजार जाण्याची शक्यता असते.

सिकलसेलच्या दुसऱ्या प्रकारात मात्र व्यक्तींमध्ये आजाराची गंभीर लक्षणे दिसून येतात आणि त्यांच्या अपत्यांना हा आजार होण्याची शक्यता जास्त असते.

सामान्यत: आई-वडील दोघेही सामान्य असतील, तर १०० टक्के मुले सामान्य असतात. आई किंवा वडील यापैकी एक वाहक असल्यास ५० टक्के मुले वाहक व ५० टक्के सामान्य असतात. आई व वडील दोघेही वाहक असल्यास २५ टक्के मुले सिकलसेल रुग्ण, ५० टक्के वाहक व २५ टक्के सामान्य असतात. एक पालक रुग्ण व दुसरा सामान्य असल्यास सर्व मुले वाहक होतात. एक पालक रुग्ण व दुसरा वाहक असल्यास ५० टक्के मुले रुग्ण व ५० टक्के वाहक होतात. दोन्ही पालक रुग्ण असल्यास १०० टक्के मुले सिकलसेल रुग्ण होतात.

**सिकलसेल रुग्णांची लक्षणे**

हात-पायांना सूज येणे, सांधेदुखी, तीव्र वेदना, प्लीहा वाढणे, वारंवार सर्दी-खोकला, सौम्य ताप, लवकर थकवा येणे ही प्रमुख लक्षणे आहेत. हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी झाल्याने चेहरा निस्तेज दिसतो व डोळे पिवळसर होतात. काही वेळा अचानक तीव्र वेदना, सूज व ताप येण्याची गंभीर अवस्था उद्भवते, याला सिकलसेल क्रायसिस असे म्हणतात. अशा वेळी तत्काळ वैद्यकीय उपचार आवश्यक असतात.

**सिकलसेलबाबत खबरदारी**

सिकलसेल ॲनिमिया पूर्णपणे बरा होत नसला, तरी वेळेवर तपासणी, नियमित उपचार, योग्य समुपदेशन व जनजागृतीद्वारे त्यावर प्रभावी नियंत्रण मिळविता येते. विवाहापूर्वी दोघांनीही सिकलसेल तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. कुटुंबात सिकलसेल आजार असल्यास सर्व सदस्यांनी तपासणी करून घ्यावी.

वाहक म्हणजे रुग्ण नसतो; मात्र पुढील पिढीसाठी धोका असल्याने खबरदारी घेणे महत्त्वाचे आहे.

गर्भवती महिलांसाठी सिकलसेल तपासणी अनिवार्य असून, आवश्यक असल्यास गर्भनिदानाची सुविधा उपलब्ध आहे. रुग्णांनी दररोज पुरेसे पाणी पिणे, डॉक्टरांच्या सल्ल्याने फॉलिक ॲसिड गोळ्या घेणे, संतुलित आहार घेणे, दारू व धूम्रपान टाळणे आवश्यक आहे. अतिउष्णता, अतिथंडी व उंच डोंगराळ भागात जाणे टाळावे.

**जिल्हा रुग्णालयातील सुविधा**

जिल्हा रुग्णालयात सिकलसेल रुग्णांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामध्ये मोफत सिकलसेल तपासणी, इलेक्ट्रोफोरेसिस व एचपीएलसी चाचणी, मोफत फॉलिक ॲसिड गोळ्या, गर्भवती महिलांसाठी मोफत गर्भनिदान, सिकलसेल रुग्णांसाठी राखीव खाटा, आवश्यकतेनुसार मोफत रक्तपुरवठा, वेळेवर तपासणी, नियमित उपचार व जनजागृतीच्या माध्यमातून रुग्णांचे जीवनमान सुधारता येते, अशी माहिती जिल्हा रुग्णालयाचे रक्तविज्ञान विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. चंद्रशेखर आवारे यांनी दिली.

# नाशिक मनपासाठी ५६.६७ टक्के, मतदार वाढूनही पाच टक्के घट, ७३५ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** नाशिक महानगरपालिकेच्या सातव्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी रात्री साडेआठ वाजेपर्यंत काही मतदान केंद्रांवर मतदान सुरू होते. त्यानंतर एकूण ५६.६७ टक्के मतदान झाले आहे. गेल्यावेळेस पेक्षा पाच टक्क्यांनी मतदानाचा टक्का घसरला आहे.

२०१७ टक्के झालेल्या महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत ६१.६० टक्के मतदान झाले होते. त्यानंतर आठ वर्षानंतर मतदान होत असल्याने अधिकाधिक टक्केवारी वाढण्याची शक्यता होती. परंतु ती घटली आहे. नाशिक शहरात सिडको भागात पैसे वाटपाच्या चर्चांमुळे सावता नगर भागात गर्दी झाली होती. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला, तर सायंकाळी काठेगल्ली भागातील एका शाळेत बोगस मतदानाच्या तक्रारीवरून भाजप आ. देवयानी फरांदे आणि उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी आ. वसंत गिते यांच्या समर्थकांत वाद झाले. किरकोळ वाद वगळता मतदान शांततेत पार पडले. नाशिक शहरात विविध दहा ठिकाणी मतमोजणी सुरू असून सर्व निकाल दुपारी चार वाजेपर्यंत लागण्याची शक्यता आहे.

नाशिक महानगरपालिकेत सकाळी साडेसात वाजता मतदानाला सुरुवात झाली. सुरुवातीचे काही तास मतदान शांततेत पार पडले. पहिल्या दोन तासांत नाशिक शहरात ६.६ टक्के मतदान झाले. त्यानंतर मतदानाचा वेग काहीसा वाढला. मात्र अपेक्षित गती मतदान प्रक्रियेला मिळाली नाही. दुपारी साडेतीन वाजेपर्यंत नाशिकमध्ये मतदान ३९. ६४ टक्क्यांपर्यंत पोहोचले. प्रशासनाच्या प्राथमिक अंदाजानुसार सायंकाळी साडेपाच वाजता मतदान प्रक्रिया संपेपर्यंत नाशिकमध्ये मतदानाचा टक्का सुमारे ५७ टक्के, तर मालेगावमध्ये सुमारे ५५ टक्के राहिला.

दरम्यान, सकाळी मतदान सुरू झाल्यानंतर सिडको प्रभाग क्रमांक २९ मधील दक्षिणमुखी मारुती मंदिराशेजारील मतदान केंद्रावर मतदान यंत्रातील भाजप पुरस्कृत उमेदवाराचे बटण कार्यरत नसल्याची तक्रार करण्यात आली. तक्रारीची दखल घेत प्रशासनाने तातडीने नवीन मतदान यंत्र बसवले, त्यानंतर मतदान प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली.

नाशिक शहरातील अनेक प्रभागांमध्ये मतदानादरम्यान इच्छुक उमेदवारांच्या कार्यालयात पैसे व भेटवस्तूंच्या वाटपाच्या चर्चा रंगल्या होत्या. काही ठिकाणी मोठी गर्दीही पाहायला मिळाली. मात्र या प्रकारांवर प्रशासनाकडून अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

मतदान प्रक्रिया पूर्ण झाली आहे. भाजपने ‘१०० प्लस’चा नारा दिला होता. मतदारांचा कल पाहता आम्ही किमान ८० प्लस जागा जिंकू, असा आम्हाला विश्वास आहे. नाशिककर मतदारांचे मन:पूर्वक आभार.

– सुनील केदार, अध्यक्ष, भाजप नाशिक महानगर जिल्हा

नाशिक महानगरपालिका निवडणुकीतील शांततेत पार पडलेल्या मतदानानंतर राष्ट्रवादी काँग्रेसह्नशिवसेनाह्नरिपब्लिकन सेना युतीच्या वतीने माजी खासदार समीर भुजबळ यांनी मतदारांचे आभार मानले.युतीने मांडलेला विकासाचा अजेंडा आणि वचननामा नाशिककरांना पसंत पडला असून मतदारांनी आम्हाला अभूतपूर्व प्रतिसाद दिला आहे,

– समीर भुजबळ , माजी खासदार


पोलीस आयुक्त संदीप कर्णिक


मनपा आयुक्त मनिषा खत्री










नाशिक महापालिका निवडणुकीसाठी शहर व परिसरात काल विविध ठिकाणी मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी मतदारांची चांगला प्रतिसाद मिळाला. अनेक ठिकाणी मतदारांनी रांगा लावल्याचे दिसून आले. त्या क्षणी टिपण्यात आलेली विविध छायचित्रे
























## ईव्हीएममधील तांत्रिक अडचणींमुळे मतदान प्रक्रियेत गोंधळ

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- नाशिकसह राज्यात २९ महानगरपालिकांतील उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे. नाशिक महापालिकेमध्ये बहुदस्यीय प्रभाग पद्धत असल्याने तेथे मतदारांना चार मते द्यावी लागली. दरम्यान, शहरात मतदानाला सुरुवात होण्यापूर्वीच सर्वच मतदान केंद्रांबाहेर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दरम्यान नाशिकमधील ईव्हीएम संदर्भातील तक्रारी आणि तांत्रिक अडचणींमुळे प्रशासनाची धावपळ उडाली होती.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पडावी यासाठी अतिरिक्त दक्षता घेण्यात आली. या घटनांचा मतदानाच्या एकूण वातावरणावर काय परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रभाग क्रमांक २४ मधील मॉर्डन हायस्कूलच्या खोली क्रमांक ८ मध्ये ठेवलेल्या ईव्हीएममध्ये तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने सकाळी मतदान सुरू होण्यास विलंब झाला. मशीन कार्यान्वित न झाल्याने काही काळ मतदारांना मतदानासाठी थांबावे लागले. निवडणूक कर्मचाऱ्यांनी तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देऊन पर्यायी व्यवस्था करण्याचा प्रयत्न केला. महापालिका निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी शहरात काही मतदान केंद्रांवर गोंधळाचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. प्रभाग क्रमांक २४ मधील एका मतदान केंद्रावर ईव्हीएम संदर्भात गंभीर आरोप झाल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. महत्वाचे म्हणजे शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवारांकडून असा दावा करण्यात आला आहे की, धनुष्यबाण या चिन्हासमोर बटण दाबल्यानंतर मशीनवर भाजपच्या चिन्हाचा लाईट लागत असल्याचे मतदारांच्या निदर्शनास आले.

हा प्रकार प्रभाग क्रमांक २४ मधील ग्रामोदय प्राथमिक शाळेतील मतदान केंद्रावर घडल्याचे सांगण्यात येत आहे. काही मतदारांनी प्रत्यक्ष मतदान करताना संशयास्पद प्रकार घडल्याचा आरोप करत निवडणूक अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारही दाखल केली आहे. ईव्हीएमच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाल्यामुळे मतदान केंद्रावर काही काळ तणाव निर्माण झाला होता.

दरम्यान, शिंदेंच्या शिवसेनेच्या उमेदवारांनी गंभीर आरोप केले आहेत. ईव्हीएम मशीनबाबत तक्रार करणाऱ्या मतदारांना धमकावले जात असल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे मतदान प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत असून, निष्पक्ष चौकशीची मागणी करण्यात आली. या प्रकरणामुळे काही काळ मतदान केंद्राबाहेर गर्दी वाढली होती आणि पोलिसांना परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी हस्तक्षेप करावा लागला.

दरम्यान नाशिकरोड येथील शिवाजी पुतळा परिसरात असलेल्या प्रभाग १७ मध्ये भाजपाचे उमेदवार असलेल्या सौ. आढाव यांचे वडील व माजी नगरसेवक दिनकर आढाव यांच्या गाडीमध्ये दोन लाख रुपयांची रोकड असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी या गाडीची तपासणी घेतली आणि त्यामध्ये दोन लाख रुपये मिळून आल्याने याबाबतची तक्रार ही नाशिकरोड पोलीस ठाण्यामध्ये दाखल करण्यात आली आहे.

तर दुसरीकडे सिडको प्रभागातील प्रभाग क्रमांक २५ मध्ये शिवसेनेतून भाजपामध्ये आलेले ज्येष्ठ नेते सुधाकर बडगुजर यांच्या कार्यालयामध्ये पैसे वाटप चालू असल्याची माहिती मिळाल्यानंतर नागरिकांनी या ठिकाणी मोठी गर्दी केली होती. त्यांचे चिरंजीव दीपक बडगुजर हे प्रभाग क्रमांक २९ मधून निवडणूक लढवत आहे. या दोन्ही प्रभागांसाठी या ठिकाणी नागरिकांनी पैसे घेण्यासाठी जमल्याने खूप गर्दी झाली आणि त्यामुळे एकच गोंधळ उडाला. घटनेची माहिती मिळाल्यानंतर तातडीने पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि सौम्य लाठिमार करून या ठिकाणी असलेली गर्दी पांगविण्यात आली पण या ठिकाणी पैसे वाटप चालू होते की नाही. याबाबत प्रशासनाकडून मात्र कोणत्याही प्रकारचा खुलासा करण्यात आलेला नाही.

नाशिकमध्ये काल सकाळी मतदान प्रक्रिया सुरू झाल्यानंतर अनेक प्रभागांमध्ये इच्छुक उमेदवारांच्या कार्यालयात पैशाचे वाटप तसेच भेटवस्तूंचे वाटप केले जात असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत होते. अनेक ठिकाणी गर्दी होती. त्यावर मात्र प्रशासनाने कोणतेही भाष्य केलेले नाही.

दरम्यान निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये, म्हणून मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. स्वतः पोलीस आयुक्त संदीप कर्णिक हे बंदोबस्तासाठी तैनात असल्यामुळे अनेक भागात त्यांनी स्वतः फिरून माहिती घेतली. बंदोबस्तात कुठेही कमतरता जाणवू नये या दृष्टिकोनातून त्यांनी काम केले. पोलीस आयुक्तांची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण ठरली. त्यामुळे किरकोळ अपवाद वगळता नाशिकमधील निवडणूक प्रक्रिया अतिशय शांतता आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्याने पोलीस आयुक्तांच्या भूमिकेचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे.

नाशिक महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी जशी निवडणूक प्रक्रिया सुरू झाली तसे सकाळी साडेसात वाजेपासून या संपूर्ण प्रक्रिये वरती लक्ष ठेवले. त्यांच्याबरोबर या निवडणूक प्रक्रियेमध्ये अतिरिक्त आयुक्त सुषमा नायर, चौधरी, उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर, महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद हे देखील या सर्व परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. मनीषा खत्री यांनी अनेक मतदान केंद्रांवर प्रत्यक्ष भेटी दिल्या. तेथील कामकाजाची माहिती घेतली. कुठेही मतदान प्रक्रियेत खंड पडू नये किंवा त्यामध्ये कुठलीही कमतरता येऊ नये, यासाठी स्वतः मनीषा खत्री यांनी दिवसभर घेतलेली मेहनत ही सर्व निवडणूक प्रक्रियेतील सहभागी कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देणारी होती.







## सातपूरला मतदारांचा मतदानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**सातपूर (भ्रमर प्रतिनिधी)** :- नाशिक महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक मतदानाची प्रक्रिया शांततेत आणि सुरळीतपणे पार पडली. सकाळपासूनच मतदान केंद्रांवर मतदारांची रांग लागली होती. युवक, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून आपला मतदानाचा हक्क बजावला.

सकाळी मतदान सुरू होताच काही केंद्रांवर मतदारांची गर्दी दिसून आली. विशेषतः महिलांचा आणि पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या तरुणांचा सहभाग लक्षणीय ठरला. दुपारनंतरही मतदानाचा ओघ कायम राहिला. कुठेही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस प्रशासनाकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. संवेदनशील मतदान केंद्रांवर अतिरिक्त पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला होता.

नाशिक महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ अंतर्गत प्रभाग क्रमांक १० मधील मीनाताई ठाकरे मनपा शाळा येथील मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रियेदरम्यान ईव्हीएम मशीनच्या तांत्रिक अडचणींमुळे मोठा गोंधळ उडाला होता.

### मतदान केंद्र क्रमांक २४ वर बटन न दाबले जाण्याचा प्रकार

मीनाताई ठाकरे मनपा शाळेतील मतदान केंद्र क्रमांक २४ येथे मतदार मतदान करत असताना ईव्हीएम मशीनवरील बटन प्रेस होत नसल्याची तक्रार अनेक मतदारांनी केली. या तांत्रिक अडचणीमुळे मतदान केंद्रात तणावाचे वातावरण निर्माण झाले. महत्त्वाची बाब म्हणजे, मतदारांनी तक्रार केल्यानंतर समस्या तात्काळ सोडवण्याऐवजी दुसरे बटन दाबा असा सल्ला दिला जात असल्याचे आरोप काही मतदार व इच्छुक उमेदवारांकडून करण्यात आले. यामुळे मतदान प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या घटनेनंतर मतदान अधिकारी, मतदार तसेच इच्छुक उमेदवार यांच्यात शाब्दिक वाद व गोंधळ निर्माण झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

### मतदान केंद्र क्रमांक २५ वर उमेदवार गट मांडणीवर आक्षेप

याच शाळेतील मतदान केंद्र क्रमांक २५ येथेही मतदारांचा गोंधळ उडाल्याची घटना घडली. येथे ईव्हीएम मशीनवर अ, ब, क, ड या उमेदवार गटांची मांडणी उलटसुलट असल्याने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला.

मतदारांना नेमका कोणत्या उमेदवाराला मतदान करायचे, याबाबत स्पष्टता नसल्याने काही काळ मतदान प्रक्रिया खोळंबल्याची माहिती आहे. यावरही मतदान केंद्रात उपस्थित इच्छुक उमेदवारांनी व नागरिकांनी आक्षेप नोंदवला. सकाळी तुरळक गर्दी, दुपारनंतर मतदान केंद्रांवर मोठी रांग दरम्यान, प्रभाग क्रमांक ८, ९, १० आणि ११ मधील मतदान केंद्रांवर सकाळच्या सुमारास मतदारांची उपस्थिती अत्यंत तुरळक होती. मात्र, दुपारनंतर चित्र बदलले असून सर्वच मतदान केंद्रांवर मतदारांनी मोठी गर्दी केल्याचे पाहायला मिळाले. उन्हाचा कडाका असूनही नागरिकांनी मतदानासाठी उत्स्फूर्त सहभाग घेतला. अनेक ठिकाणी मतदारांच्या रांगा लागल्याचे चित्र दिसून आले. निवडणूक प्रशासनाने दखल घ्यावी, नागरिकांची मागणी ईव्हीएम मशीनमधील तांत्रिक अडचणी, उमेदवार गटांची मांडणी आणि मतदान अधिकाऱ्यांची भूमिका यावरून निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेबाबत नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणाची निवडणूक आयोग व प्रशासनाने तातडीने चौकशी करून स्पष्टीकरण द्यावे, तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी मतदार व उमेदवारांकडून होत आहे.











दीपक बिल्डर्स अँड डेव्हलपर्सचे मॅनेजिंग डायरेक्टर दीपक चंदे



अ‍ॅड. मुकूंद रत्नाकर ढोरे





## आजचे वाढदिवस



**अनिल मिश्रा**
सचिव, औद्योगिक कामगार संघटना



**योगेश शिंदे**
फिजिकल डायरेक्टर, ओझर स्कूल

## ओझरला जान्हवी कदम बिनविरोध

**ओझर (भ्रमर वार्ताहर) :–** ओझर नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत जान्हवी यतीन कदम यांची बिनविरोध निवड झाली. ओझर नगर परिषदेत पहिली सर्वसाधारण सभा झाली. या सभेत ही बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी २७ पैकी २५ सदस्य उपस्थित होते.







नाशिक शहरातील विविध ठिकाणी मनपा निवडणुकीसाठी मतदारांनी केलेली गर्दी तर काही ठिकाणी कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी केलेली कामगिरी

# गजानन शेलार यांचा जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** केवळ एका खासदारावर नाशिक जिल्ह्यात काम करणे कठीण जात असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या अध्यक्षांकडून लाचार व अपमानास्पद वागणूक मिळत असल्यामुळे नाशिकचे माजी नगरसेवक व राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष गजानन शेलार यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

या संदर्भात शेलार यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नाशिक शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी माझी नियुक्ती झाली होती. पक्षामध्ये फूट पडल्यानंतर शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचे मी ठरवले होते. मला तीन वर्षांपासून पक्षाच्या फुटी नंतर पक्षाचा शहर जिल्हा अध्यक्ष म्हणून काम करीत आहे.

नाशिक जिल्ह्यात राष्ट्रवादी शरद पवार गटाचा केवळ एक खासदार तोही दिंडोरीचा आहे. मात्र जिल्ह्यात पंधरा पैकी एकही आमदार महाविकास आघाडीचा नसल्याने या ठिकाणी काम करणे फार कठीण जाते. यास या ठिकाणी सत्तारूढ पक्षाचे चार मंत्री व संकट मोचक मंत्री गिरीश महाजन देखील नाशिक जिल्ह्यामध्ये काम करतात. अशा स्थितीत पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी पक्षाचे काम उभे करण्याचा प्रयत्न करतात. परंतु पक्षाचे अध्यक्ष जिल्हा अध्यक्षांचा फोन येत नाही त्यांना मार्गदर्शन किंवा मदत मिळत नाही. एवढेच नाही तर नाशिक महानगरपालिका निवडणुकीत पक्ष उमेदवारांच्या प्रचार सभांमध्ये एकही स्टार प्रचारक प्रचारासाठी येऊ शकले नाही, त्याचबरोबर कार्यालयीन पदाधिकाऱ्यांकडून मदत होत नाही, संबंधितांचे फोन रिंगा वाजवून देखील ते उचलत नाही.

इतकी लाचार व अपमानास्पद वागणूक जिल्हाध्यक्षांना मिळणार असेल तर अशा पदावर राहणे माझ्यासारख्या कार्यकर्त्याला संयुक्तिक वाटत नाही. या सर्व परिस्थितीला व दिलेल्या २९ उमेदवारांना पक्षाकडून कुठलीही मदत होत नसल्यामुळे मी निवडणुकीच्या काळातच माझ्या पदाचा राजीनामा देणार होतो परंतु निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांना त्याचा फटका बसला असता आज निवडणूक संपल्याकारणाने मी माझ्या पदाचा राजीनामा देत आहे. मात्र शरद पवार यांचा कार्यकर्ता म्हणून मी पक्षाचा एक सर्वसाधारण सभासद म्हणून राहील, तरी माझा माझा राजीनामा आपण मंजूर करावा व योग्य व्यक्ती या ठिकाणी नियुक्त करावी, अशी विनंती गजानन शेलार यांनी राजीनामा दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

# संत निवृत्तीनाथ महाराज यात्रेत वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य सुविधा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** संत निवृत्तीनाथ महाराजांची वार्षिक यात्रा त्र्यंबकेश्वर येथे मोठ्या भक्तिभावात पार पडली. यात्रा काळात राज्यभरातून हजारो वारकरी त्र्यंबकेश्वर येथे दाखल होत असल्याने त्यांच्या आरोग्य सुरक्षेला प्राधान्य देत जिल्हा परिषद नाशिक आरोग्य विभाग व पंचायत समिती त्र्यंबकेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने व्यापक स्वरूपात मोफत आरोग्य सेवा पुरविण्यात आल्या.

यात्रा कालावधीत तीन दिवसांत एकूण ११ ठिकाणी आरोग्य सेवा केंद्रे (आरोग्य बुथ) कार्यरत ठेवण्यात आली होती. या कालावधीत वारकऱ्यांसाठी बाह्यरुग्ण तपासणी, प्राथमिक उपचार, औषधोपचार, ताप–सर्दी–खोकला, जखमा, पायांचे दुखणे, थकवा, रक्तदाब व मधुमेह तपासणी आदी सेवा मोफत देण्यात आल्या.

उपलब्ध आकडेवारीनुसार पहिल्या दिवशी १,५८१ वारकऱ्यांची, दुसऱ्या दिवशी २,५४४ वारकऱ्यांची तर तिसऱ्या दिवशी ४६० वारकऱ्यांची तपासणी करण्यात आली. अशा प्रकारे यात्रेच्या तीन दिवसांत एकूण ४,५८५ वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा देण्यात आली.

संत निवृत्तीनाथ महाराज मंदिर, मुख्य महादेव मंदिर, गंगागोदावरी मंदिर परिसर, ब्रह्मगिरी मार्गावरील विविध फाटे, सापगाव फाटा, आपला दवाखाना आदी ठिकाणी आरोग्य बुथद्वारे मोठ्या प्रमाणावर सेवा देण्यात आली. गरज भासल्यास तातडीचे उपचार करून गंभीर रुग्णांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

यात्रेदरम्यान डॉक्टर, परिचारिका, आरोग्य सेवक व सहाय्यक कर्मचारी यांचे पथक अहोरात्र कार्यरत होते. तसेच स्वच्छता, शुद्ध पिण्याचे पाणी, संसर्गजन्य आजारांबाबत प्रतिबंधात्मक जनजागृती करण्यात आली.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाच्या या नियोजनबद्ध उपक्रमामुळे वारकऱ्यांना वेळेवर व दर्जेदार आरोग्य सेवा मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. यात्रा काळात भाविकांच्या आरोग्य संरक्षणासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविण्यात आल्याचे आरोग्य विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

# दिंडी वारकऱ्यांना त्रिमूर्तीनगर मित्रमंडळातर्फे अन्नदान



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** श्री संत निवृत्तीनाथ महाराज यात्रेनिमित्त त्र्यंबकेश्वर येथे पायी जाणाऱ्या सुमारे पाच हजार वारकऱ्यांना त्रिमूर्तीनगर मित्रमंडळ आणि भजनी मंडळातर्फे अन्नदान वाटप करण्यात आले.

गेल्या २० वर्षांपासून सातत्याने हा स्तुत्य असा उपक्रम मंडळाच्या वतीने राबविला जात असून या अन्नदान सोहळ्यात निमगव्हाण (ता. चांदवड) ते त्र्यंबकेश्वर पायी दिंडीसह अनेक दिंड्याचा सहभाग आहे. त्यांना मंडळाच्या वतीने अन्नदान करण्यात आले. यावेळी प्रसिद्ध कीर्तनकार फौजी महाराज सूर्यवंशी व सदाशिव चौधरी यांनी कीर्तन सादर केले. या सामाजिक व भावनिक उपक्रमाप्रसंगी नयन सूर्यवंशी, हितेश वाघेला, विजय वाबळे, मुक्ता सूर्यवंशी, रेखा सूर्यवंशी, दिलीप पेंढारकर, कल्पना पेंढारकर, चालक आबा महाराज, रतन महाराज, छबू शिंदे, नागेश ठोंबरे, समाधान चव्हाण, सुभाष गायकवाड यांच्यासह भाविक उपस्थित होते.

# निफाडला १८ जानेवारीला विधी सेवा व शासकीय योजनांचे भव्य महाशिबिर

**निफाड (भ्रमर प्रतिनिधी) :–** सामान्य नागरिकांना सहज, सुलभ व मोफत न्याय मिळावा, तसेच शासनाच्या विविध विधी सेवा व कल्याणकारी योजनांचा थेट लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावा, या उदात्त उद्देशाने निफाड तालुक्यात विधी सेवा व शासकीय योजनांचे भव्य महाशिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे महाशिबिर रविवार (दि. १८) सकाळी १०.३० वाजता तहसील कार्यालय प्रांगण, निफाड येथे आयोजित करण्यात आले आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या मार्गदर्शन व निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नाशिक, जिल्हा प्रशासन, नाशिक आणि तालुका विधी सेवा समिती, निफाड यांच्या संयुक्त विद्यमाने या महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत न्याय पोहोचविण्याच्या दिशेने हे शिबिर अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. या विधी सेवा महाशिबिराचे उद्घाटन न्यायमूर्ती सारंग डी. कोतवाल, न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई तथा पालक न्यायमूर्ती, नाशिक यांच्या शुभहस्ते होणार आहे. यावेळी न्यायमूर्ती जितेंद्र शा. जैन व न्यायमूर्ती अश्विन डी. भोबे, न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई तथा पालक न्यायमूर्ती, नाशिक यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. मान्यवर न्यायमूर्तींच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाचे महत्त्व अधिकच वाढले आहे. महाशिबिराचे आयोजन एस. डी. जगमलानी, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. न्यायालयीन व्यवस्था आणि विधी सेवेचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हे शिबिर मार्गदर्शक ठरणार आहे. या महाशिबिरामध्ये नागरिकांना मोफत कायदेशीर सल्ला, विविध कायदे, हक्क व योजनांची माहिती तसेच प्रलंबित प्रकरणांबाबत मार्गदर्शन देण्यात येणार आहे. महिलांचे हक्क, ज्येष्ठ नागरिकांचे संरक्षण, घरगुती हिंसाचार प्रतिबंध, कामगार कायदे, शेतकऱ्यांशी संबंधित प्रश्न, जमीन व वारसाहक्क प्रकरणे, मोटार अपघात दावे, तसेच दुर्बल व वंचित घटकांसाठी उपलब्ध शासकीय योजनांची सविस्तर माहिती नागरिकांना मिळणार आहे.महाशिबिरात लोकअदालतीच्या माध्यमातून तत्काळ व मैत्रीपूर्ण न्याय मिळण्याची संधीही उपलब्ध होणार असून, त्यामुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या प्रकरणांच्या निकाली लागण्यास गती मिळणार आहे. या उपक्रमासाठी जिल्हाधिकारी नाशिक आयुष प्रसाद, अ. अ. अ. शेख, जिल्हा न्यायाधीशक्ष१ तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, निफाड आणि सुधाकर प्र. भोसले, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नाशिक यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. प्रशासन व न्याय यंत्रणेमधील समन्वयाचे हे उत्तम उदाहरण ठरत आहे.या विधी सेवा व शासकीय योजनांच्या महाशिबिराचा निफाड तालुक्यातील महिला, शेतकरी, कामगार, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. न्याय जनतेच्या दारी आणणारे हे महाशिबिर सामाजिक न्यायाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

# देवळ्यात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती



**देवळा (भ्रमर वार्ताहर) :–** मविप्र संस्थेच्या देवळा येथील अभिनव बालविकास मंदिर व जनता विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक मनीष बोरसे यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद, तर पूनम पाटील व रोहिणी देवरे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपशिक्षक सुरेश आहेर व निवृत्ती रौंदळ यांनी केले. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्याविषयी विद्यालयातील विद्यार्थी जागृती बच्छाव, आर्यन वाघ, वैदेही गुंजाळ, ऋषी बर्वे, रवी पवार, अक्षरा आहेर, स्वरूप देवरे, दिया निकम, किमया सूर्यवंशी, प्रणव मेधने, आर्यन आहेर, देवांश ठाकरे, अनन्या वाघ, सुहानी पगार, रचना जाधव, ज्ञानेश्वरी बोरसे, जयेश शिरसाठ आदी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षकांच्या वतीने विद्यालयाच्या उपशिक्षिका पूनम पाटील, उमेश अहिरे, निवृत्ती रौंदळ यांनी राजमाता जिजाऊ विवेकानंद यांच्या जीवनकार्याविषयी माहिती दिली. तसेच मुख्याध्यापक मनीष बोरसे यांनी विद्यार्थ्यांना राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे विचार विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगातही तरुणांना आत्मविश्वास व योग्य दिशा दाखवत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक सुरेश आहेर, निवृत्ती रौंदळ यांनी केले. आभार पुरुराज शेवाळे यांनी मानले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## जळगावमध्ये बोगस मतदानाचा डाव उधळला

**जळगाव (भ्रमर वृत्तसेवा):–** जळगाव महापालिकेच्या प्रभाग क्रमांक ५ 'अ' मधील निवडणूक प्रक्रियेला बोगस मतदानाच्या प्रयत्नाने गालबोट लागले. आर. आर. विद्यालय मतदान केंद्रावर सुमारे ४० ते ४५ संशयित मतदारांची फौज घुसल्याने परिसरात मोठा तणाव निर्माण झाला होता. शिवसेना (शिंदे गट) जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे आणि अपक्ष उमेदवार अ‍ॅड. पियुष पाटील यांच्यातील प्रतिष्ठेच्या लढतीत या प्रकारामुळे प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली. आर. आर. विद्यालयात सकाळपासूनच मतदानासाठी मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. मात्र, दुपारी काही मतदारांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने अपक्ष उमेदवार अ‍ॅड. पियुष पाटील यांनी तातडीने आक्रमक पवित्रा घेतला. त्यांनी निवडणूक अधिकाऱ्यांकडे थेट तक्रार नोंदवत या मतदारांच्या ओळखपत्रांची पडताळणी करण्याची मागणी केली. प्रशासकीय कारवाईचा बडगा: तक्रार मिळताच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सतर्कता दाखवत ४० ते ४५ संशयितांची कसून चौकशी केली. जेव्हा या मतदारांकडे अधिकृत ओळखपत्र आणि वास्तव्याचा पुरावा मागण्यात आला, तेव्हा ते सादर करण्यात ही मंडळी सपशेल अपयशी ठरली.

## जाहीर नोटीस

मी खालील सही करणार आज दि. १६/१/२०२६ रोजी जाहीर करते की, माझे पती **जुगलकिशोर मोतीलाल भुतडा** यांचा मृत्यू दि. २६/१०/२०२५ रोजी झाल्याने त्यांच्या नावावर असलेली फोरव्हीलर इनोव्हा गाडी क्रमांक MH 15 DC 3092 व टूव्हीलर अ‍ॅक्टिव्हा गाडी क्रमांक MH 15 CZ 0796 या दोन्ही गाड्या माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी मी **श्रीमती चंद्रकला जुगलकिशोर भुतडा** रा. फ्लॅट नंबर १२, कर्मा हाईट, काठे गल्ली, नाशिक–४२२०११ वारस हक्कदार (पत्नी) म्हणून मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे अर्ज करीत आहे. सदर फोरव्हीलर इनोव्हा गाडी व टूव्हीलर अ‍ॅक्टिव्हा गाडी या दोन्ही गाड्या माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी कोणाची हरकत असल्यास सात दिवसांच्या आत समक्ष भेटून कळवावे किंवा मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे लेखी संपर्क साधावा. सात दिवसांनंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. कळावे.

सही/–
**श्रीमती चंद्रकला जुगलकिशोर भुतडा**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक संपादक श्री. चंदुलाल शाह यांनी चैतन्य आर्ट्स, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक-३ येथे छापून भ्रमर कार्यालय, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक -३ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी २५१४६५०, २५११७६०
E-Mail-daily_bhramar@rediffmail.com नाशिकरोड संपर्क कार्यालय, बिटको क्लासिक, मुक्तिधाम समोर, नाशिकरोड, दूरध्वनी २४५६५४९. कार्यकारी संपादक- हितेश चंदुलाल शाह ✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
Printed, Published and Owned by Shri. Chandulal Shah and printed at Chaitanya Arts, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3 and published at Daily Bhramar, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3. ✻ Editor : Chandulal Shah ✻ Executive Editor : Hitesh Chandulal Shah.